# प्रिय कविते

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २१३५



REFBK-0019076
REFBK-0019076

प्रो. मा. का. देशपांडे एम. ए.

२१३५ काव्य
संदीप
८१३५०
२८।२।०४

५१३५०
२१३५
काव्य
२०/२/७८

# प्रिय कविते,

प्रा. माधव का. देशपांडे

REFBK-0019076

प्रस्तावना

कविवर्य कुसुमाग्रज

रसग्रहण

डॉ. चिंतामणराव देशमुख

डॉ. वि. भि. कोलते

राजकवी : रा. अ. काळेले

लोककवी : मनमोहन

कविवर्य : बा. भ. बोरकर

महाराष्ट्र-कवी : यशवंत

पद्मश्री : अनंत काणेकर

कविवर्य : 'अनिल'

प्रकाशक :
गोविंद यशवंत राणे
गो. य. राणे प्रकाशन,
टिळक रोड, पुणे ४११०३०

मुद्रक :
गो. य. हिरवे
साथीदार प्रिंटर्स,
४६१/४ सदाशिव पेठ,
पुणें ४११०३०



डॉ. सी. डी. देशमुख

# अर्पण-पत्रिका

तूच दाविले मूढ जगाला,
कसे जगावे नित वज्रासम,
कसे वदावे मात्र कृतीने
आणि स्फुरावे नित ज्वालेसम

झुंजझुंजता तत्त्व-रक्षणा
नित्य राखिले हृदय सुकोमल,
कणाकणाने आयु अर्पिले
जपावयाते जे जे मंगल

ज्ञानलालसा आद्यऋषीसम
नित्य राबली तम उजळाया,
कायस्थाची इमानदारी
मिळेल स्वप्नीं अता बघाया

कुठे भारतीं अता दिसावी
अशी लेखणी, अजोड जोडी
एक कवीश्वर, एक धुरंधर
गोविंदाग्रज आणिक सी. डी.!

# प्रस्तावना

एखाद्या डोंगरावरील पहाडी वाटेने जात असताना, अचानक समोर निर्मळ, बर्फगार पाण्याचे टाके दिसावे तसे या काव्याचे प्रथमदर्शन मला घडले आहे. अनपेक्षित आणि आनंददायकही. प्रा. मा. का. देशपांडे 'चांगले' कवीच काय, पण 'कवी' असतील याची मला अजिबात कल्पना नव्हती. इंग्रजी भाषेचे आणि वाङ्मयाचे पंडित म्हणून ते मशहूर आहेत. 'मा. का.' म्हणजे 'इंग्रजीचा अभ्यास', हे समीकरण त्यांच्या वर्गामुळे पुण्यात आणि अनेक पुस्तकांच्या द्वारा महाराष्ट्रीय वाचकातही रूढ झाले आहे. काही माणसांच्या बाबतीत त्यांच्या प्रस्थापित व्याख्या आपल्या मनावर दाट अंमल गाजवीत असतात. या व्याख्यात न सामावणारे त्यांचे गुणविशेष आपल्या लक्षात येत नाहीत. प्रा. देशपांडे यांना बऱ्याच वर्षांपासून मी ओळखतो. त्यांच्या समवेत गप्पागोष्टींच्या बैठकीही अनेकदा झालेल्या आहेत पण या बैठकीतही त्यांच्या कवित्वाचा पत्ता मला कधी लागला नाही. आणि त्यांनीही तो कधी लागू दिला नाही.

**तुझ्या संगतीं नित्य धुंदलो**
**नित्य मखमली शैशव जपिले**
**तुझ्या कुशीची ऊब लाभता**
**जीवन अवघे गीतचि झाले.**

अशी कवितेसंबंधी ज्याची भाविक वृत्ति आहे तो तिच्या लौकिक व्यवहाराबाबत इतका तटस्थ राहावा हे एक आश्चर्यच समजावयास हवे. कदाचित्

**गूढ जाणतो मम रक्ताचे**
**रक्त नव्हे चंचल भ्रमराचे**
**वेड तया कोमल निष्ठेचें**
**वाटते म्हणोनी भयचि मना**

अशा काही अंतस्थ द्वंद्वात सापडल्यामुळेही ही तटस्थता निर्माण झाली असेल.

कदाचित याच कारणामुळे असेल पण प्रा. देशपांडे यांच्या कवितेला कोठेही कृत्रिमतेचा, मागणी पुरवठ्यासाठी केलेल्या खटपटीचा अथवा कीर्तीच्या मागे धावणाऱ्या महत्त्वाकांक्षेचा स्पर्शही झालेला दिसत नाही. ती त्यांच्या अंत:प्रवृत्तींना साथ देणारी, व्यक्तिगत सुखदु:खांच्या अनुभवांना शब्द देणारी, अतिशय सरळ आणि सहजस्फूर्त अशी आहे. हेही मला काहीसे अनपेक्षितच वाटले. प्रा. देशपांडे यांचे समीक्षात्मक साहित्य प्रसिद्ध आहे, आणि ते त्यांच्या पंडिती आणि विवेचक प्रज्ञेला साजेलसेही आहे. इंग्रजी वाङमयाच्या परिसरात सतत वावरणाऱ्या या प्राध्यापकाचे काव्यही पंडिती थाटाचे, इंग्रजीतील नवीनतेने संस्कारलेले असावे अशी माझी कल्पना होती. पण तेथेही आनंददायक आश्चर्याचा धक्का या कवितांनी दिला. ही सारीच कविता खास मराठी मातीचा गंध असलेली, मराठी वळणाची, आणि एकदम वाचकाच्या अंत:करणाशी बोलणारी वा भिडणारी अशी आहे. उदाहरणार्थ, '**मराठी भाकर**' कवितेतील हा अभिमान

माझ्या मावळचा कांदा
लाल तेजाचे माणिक
जानी दोस्त भाकरीचा
काय पाहिजे आणिक

बाणा ताठर मराठी
नाही कोणाची लाचारी
रक्त वीराचे पोशिते
माझी मराठी भाकरी

अथवा '**धीर होत नाही**' मधील ही वेदना

**जगलो मी ज्वालेसम**
**स्फुरलो नित तेजासम**
**उजळित तम, उजळित तम**
**स्नेहशून्य ज्योत अता तेज नाही नाही,**
**आत्मघात करण्या परि धीर होत नाही.**

किती सहजतेने वाचकाच्या मनात प्रवेश करते !

या कवितांचा महत्त्वाचा गुणविशेष ह्या की त्यांच्यामधील भावाविष्कार गुंतागुंतीचा अथवा तिरकस नसून सरळ आणि स्पष्ट आहे. कवीला जे म्हणावयाचे आहे त्याबाबत कोठेही संदिग्धता नाही. काव्य हे मनामना-मधील एक संवाद आहे हे ध्यानात घेतले म्हणजे त्याची आकलनीयता केवळ अपरिहार्यच वाटते. हा गुणविशेष प्रा. देशपांडे यांच्या कवितेत शिगोशीग भरलेला आहे. आपण कोठेही अडत नाही, अडखळत नाही, आणि आशयशोधाच्या कंटाळवाण्या प्रयत्नांत अडकून बसत नाही. कवीची शब्दकळा प्रासादिक आणि कसदार आहे. या नितळ स्वच्छ प्रवाहाबरोबर आपण प्रयत्नाविना पुढे जातो आणि एका कलंदर आणि तरीही अतिशय भावशील अशा व्यक्तित्त्वाचा प्रत्यय येतो.

कवीचे मन जीवनातील विविध अनुभवांना रसज्ञतेने आणि संकोचाचा आडपडदा न ठेवता सामोरे जात असले,

> **तुटेल कोमल तार म्हणोनी**
> **का वीणेने हलू नये ?**
> **धुंद स्वरांसह रमू नये ?**

आणि जीवनाच्या नश्वरतेला सुखानेच छेद देता येतो असा विश्वास बाळग-णारे असले तरी ते मन मूलत: अशांत, अस्वस्थ, इतकेच नव्हे तर काहीसे अगतिकही आहे. याचे प्रत्यंतर अनेक कवितांमधून येते. रागदारीमध्ये अनेक स्वर असतात, पण एकदोन स्वर प्रधान असतात. सगळे इतर स्वर त्या एका वा दोन स्वरांच्या आसपास घोटाळतात; दूर गेले तरी पुन्हा त्यांच्या जवळ येऊन थडकतात देशपांड्यांची कविताही केव्हा नाट्यमय होऊन प्रणयिनीची मनोगते समजून घेते, केव्हा आपल्या काव्यखुळ्या कलंदर जातीचा अभिमान मिरविते, तर केव्हा जीवन, ईश्वर इ. संबंधींचे काव्यात्म चिंतनही करते. जीवनातील काव्य संपल्यावर आपल्या कवितेचा उदय झाला असे त्यांनी एका ठिकाणी सांगितले आहे. पण कविमनाच्या रंगमंचकावर उशीरा येणाऱ्या या नायिकेने आपल्या सुंदर स्वराने आणि तरल पदन्यासाने त्यांच्या अनुभूतीची अनेक क्षेत्रे अगदी सहजतेने व्यापून

टाकली आहेत तिची ही विलसिते मनोवेधक आहेत यात शंका नाही. परंतु ती जेव्हा कविमनातील अशांतीचा, अस्वस्थतेचा, एकटेपणाचा आणि क्वचित उपरोधाचा आविष्कार करते तेव्हा ती अतिशय उत्कट आणि धारदार रुप धारण करते. प्रा. देशपांडे यांच्या कवितेचे हे प्रभाव-केन्द्र आहे असे मला वाटते. या दृष्टीने, **सापडे वाट न अजुनी मला, हृदया, किड्यांचे गाणे, हे हृदय जळू दे, वेडे पिशाच्च, यात्रिका, असाच आलो वाहत वाहत, आसवे, आणि नको डोकवू**—या कवितांचा मुद्दाम निर्देश करावासा वाटतो. संपूर्ण समाधानाचा शोध घेऊन निराश झालेल्या मनाचा थकवा यातील अनेक कवितांतून ठिकपत आहे — केव्हा आसवांसारखा तर तेव्हा तेजाबासारखा!

**कां उरा झोंबतो असा एकलेपणा**
**कां दंश काळजा, जरी न काही गुन्हा**
**कां उगा अनामिक जागविती यातना**
**काय हरपले, काय लोपले,**
**ना सांगाया कुणी**
**आसवे मात्र उभी नयनीं.**

या आत्मकरूणेला केव्हा तिखट प्रतिकाराचीं धार येते आणि मग **किड्यांचे गाणे, सभ्य माणसे आम्ही,** अशी गाणी लिहिली जातात. किड्यांची गर्वोक्ति तर वाचकांच्या मनांवर तीव्र चरा ओढणारीच आहे. अशा या अशांत, आक्रमक, आणि रसलोलुप काव्यांतून एक नाजुक आणि हळुवार धागा गुंफलेला आहे, आणि तो म्हणजे आईविषयीच्या अपार प्रेमाचा. जाणत्या जीवनातही आईच्या प्रेमाची स्मृती कविमनाने बकुळीच्या फुलासारखी जपून ठेविली आहे. सारे असून सुद्धा नसल्याचे दुःख त्याला वारंवार व्यथित करीत आहे. भावनेची ही कोमलता मनाला भिडणारी आहे.

शॉने एका नाटकात म्हटल्याप्रमाणे कवि स्वतःशी बोलत असतो, आणि जग ते बोलणे दुरून ऐकत असते. चांगल्या काव्याचे हे एक यथार्थ वर्णन आहे. प्रा. देशपांडे यांच्या या काव्याचे स्वरूप देखील स्वतःशी केलेल्या स्वगतासारखेच आहे. या स्वगतातून आकारणारे व्यक्तित्व बहुरूपी आहे. क्वचित् बाह्यतः विरोधी अशा वृत्तींनी घडविलेले आहे. ते अभिमानी आहे. भ्रमर वृतीचे आहे, सोंगाढोंगाचा तिरस्कार करणारे आहे. आणि हे सर्व

असूनही ते माणुसकीच्या मूलभूत भावनेशी घट्ट बांधलेले आहे. प्रा. देशपांडे यांची कठोरता, बंडखोरी बाह्य व्यवहारात अनेकांनी पाहिली असेल, पण त्यांच्या मनातील तलम माणुसकीची आणि डोळ्यांतील आसवांची कहाणी मात्र या कवितेने प्रथमतः सांगितली आहे.

हेच या कवितेचे सामर्थ्य आहे.

वि. वा. शिरवाडकर
( कुसुमाग्रज )

## रसग्रहण

**रसिकराज डॉ. चिंतामणराव देशमुख** कळवितात :

'शुद्ध कसे बोलावे व शुद्ध कसे लिहावे' हे जसे व्याकरण शिकल्याने कळते, त्याप्रमाणे, काव्य कसे उपजते व फुलते हे प्रिय कविते, वाचल्याने समजू शकते. कवीचे हृदय व मन ही दोन्ही एका विशिष्ट पिंडाची असावी लागतात, व काव्य गुणांच्या विकासाला 'अनुकूल' परिस्थितीही अवश्य असते. ही 'अनुकूल' परिस्थिती संसाराच्या दृष्टीने 'प्रतिकूल' मानली जाईल, जीत एकलेपणा, दुःखाची आच, संवेदनाची व्यथा, सहजसाध्य वैताग वगैरे घटक असावे लागतात. त्याशिवाय, अर्थात शब्दप्रभुता व वाचणाऱ्याच्या बाजूने पडसाद देण्याची शक्ति. मला गूढ गुंजन समजत नाही, व बरेचसे आधुनिक काव्य अबोध वाटते. पण आपले काव्य प्रामाणिक व प्रत्यय आणणारे आढळले. आपल्या भावना उदार आहेत व कल्पनांची झेप विशाल आहे. ( पण 'प्रतिभे'विषयी विवंचना का करावी ? पान १६.)

प्रत्येक वाचकाची आवडनिवड निराळी असणार. मला आवडलेल्या कविता या आहेत :

१. बनवुनी टाक सुगंध मला ( पान १३ ) २. देखता तुझ्या हास्याते (पान १७), ३. आला आषाढीचा वारा (पान ३७), ४. हे हृदय जळू दे (पान ४३), ५ अखेर आहे जळावयाचे ( पान ५७ ) ६. कुबेर (पान७३), ७. झाड एकले (पान ७५), ८. जरि भृंग (पान ८२), ९. का ? (पान१०२), १० ईश्वरा, पुरे आता तव दान (पान १०४), ११ काळ्या काळ्या नभीं. (पान ११५), १२. स्वच्छ चांदणी (पान १३०), १३. चंचलते. (१४०).

**डॉ. वि. भि. कोलते**, नागपूर, कळवितात :

" कविवर्य तांबे यांच्यापासून काव्यरचनेची स्फूर्ती आपणाला मिळाली, आणि रविकिरण मंडळाच्या काळात आपण वावरलात यामुळेच की काय आपली सर्व कविता भावस्पर्शी झालेली आहे. तिचा आकृतीबंध, चरण-विन्यास व शब्दरचना अत्यंत समर्पक व मोहक झालेली असून तिच्या गेयतेमुळे कवितांतील भावनांना आगळीच गोडी प्राप्त झालेली आहे.

'प्रीती' हा या बहुतेक कविताचा स्थायी भाव आहे, आणि या प्रीतीचा विषय 'कविता' आहे. कदाचित हे प्रतीकात्मकही असेल, नव्हे, तसे असावे असे अनेक कवितांवरून वाटते. तिलाच आपण आपले सर्वस्व अर्पण केले आहे. तिच्या सान्निध्यांतील आणि वियोगातील आपल्या हळुवार भावनांची अभिव्यक्ती प्रेमिकांना प्रत्ययोत्पादक वाटेल यांत शंका नाही. '**जगु दे मज**' या कवितेतील अनुभूती मला निराळयाच संदर्भात जाणवली. अध्यापकाच्या जीवनांतील हा अनुभव आपण किती समर्पकपणे व्यक्त केला आहे !

प्रीती व्यतिरिक्त इतर जीवनानुभवांनीही आपली कविता संपन्न आहे. **झाड एकले, यात्रिका, चालले प्रेत, किडयांचे गाणे**, इत्यादि कविता याची साक्ष देतील. किंबहुना या संग्रहाच्या उत्तरार्धातील बहुतेक कविता या दृष्टीने अंत:करण वेधून घेतात व म्हणून वाचाव्याशा, गाव्याशा वाटतात. '**आमुची कलंदराची जात**', क्षणोक्षणि का वधिशी पामरा, **अजाण मी, आज कळे, कोण खरा मी** इत्यादी कवितांनी माझे मन वेधून घेतले.

आज नवकाव्याचे दिवस आहेत. या काळात आपल्या कवितांचे प्रकाशन कदाचित कालबाह्य वाटेल. सामाजिकतेपेक्षा वैयक्तिक जीवनानुभूतीच्या आविष्काराकडे आज तुच्छतेने पाहिले जाते. पण वैयक्तिक जीवनानुभूतीही महत्त्वाची आहे ना ! त्यामुळेच अशा कवितांतील भावनाचा स्पर्श सहृदयांना झाल्याखेरीज राहात नाही. आपल्या कवितांनी निदान माझ्या बाबतीत हे कार्य केले आहे याचा निर्देश प्रामाणिकपणे करणे मला अवश्य वाटते. इतरांनाही तो अनुभव येईल यांत मला शंका वाटत नाही.

आपल्या या कवितांच्या पुन: पुन: वाचनात मला अनेक क्षण आनंदात घालविता आले याबद्दल आपणाला धन्यवाद !

## राजकवी रा. अ. काळेले, इंदूर :

आता मर्ढेकरांचे युग आले असले, तरी अजून तांब्यांचे युग गेले नाही हे प्रस्तुत काव्यावरून दिसून येईल. आपले स्फूर्तिस्थान कविवर्य तांबे हे असल्याचे श्री. माधवराव देशपांडे सांगतात. ते त्यांनी सांगितले नसते तरी कळण्यासारखे होते.

**'स्वप्नात राहु दे जीव पुरा**
**नेत्र न मजला उघडायाचे**
**जग मजला ना देखायाचे'**

अशा ओळींना तांब्यांच्या रामण्यवादी सुधुक्तीचा सुगंधी स्पर्श झालेला वाटतो. इतकेच काय पण तांब्यांप्रमाणे देशपांड्यांच्या काव्यमानसातही सतत जीवनमरणाचे विचारतरंग खेळतात. उदाहरणार्थ,

**ठरले तू येणार, आज ना उद्या**

किंवा

**अखेर आहे जळावयाचे**

ही हताश मरणनिश्चिती तांब्यांची, आणि

**काय करावे कळेना**
**ऐलतीर लागे गोड !**
**पैलतीराचेही वेड !!**

ही जीवनमरणातील रस्सीखेच देखील तांब्यांचीच. मात्र संतृप्ती आणि शांती यांचा वारसा देशपांड्यांना तांब्याकडून घेता आला नाही.

'**बनवुनी टाक सुगंध मला**', '**झाड एकले**', **सुगंधा**', '**स्वच्छ चांदणी**' या कविता उल्लेखनीय आहेत '**नेत्र असे**' यातील कवीची नव-दिव्य-दिदृक्षा हृद्य वाटते.

रसिकांनाही 'प्रिया कविता' खचितच प्रिय होईल. ती तांबे–भक्तांना अधिक प्रिय वाटली तर ते स्वाभाविकच. तांब्यांच्या मधुघटाची मधुर स्मरणिका म्हणून या सुंदर काव्यसंग्रहाकडे अंगुलिनिर्देश करता येईल. तो कविवर्य तांबे यांच्या जन्मशताब्दीत प्रकाशित होत आहे हा मोठाच सुयोग !

**लोककवी मनमोहन :**

कविता-ग्रंथावरी मागशी
अभिप्राय, मी द्यावा कैसा ?
तुझी रसिकता ऐतीहासिक
मी तर तात्कालांतिल हिस्सा.
स्तुती तुला भुलविणार नाही,
निंदा तुडवित तू प्रगतीपर
असा न दुसरा कधी देखिला
गजबजणारा टिळक पथावर

**कविवर्य बा. भ. बोरकर** : पत्रद्वारे कळवितात :

प्रिय माधवराव,

तुमच्या संग्रहाची मुद्रिते हाती आल्यापासून त्यातल्या कविता चाळीत-वाचीत बसणे हा माझा एक विरंगुळाच झाला आहे. तुमच्या झुंझार आणि कणखर व्यक्तिमत्वाच्या तळाशी हा जो कवितेचा निर्मळ, निरागस झरा वाहतो, त्याच्यामुळेच तुमच्या व्यक्तिमत्वाची उभारी आणि उमेदपणा या वयातही तुम्ही सांभाळू शकला आहात असे मला वाटते. तरुण वयात कवितेकडे ओढले जाणारे सगळेच तिच्याशी सलगी करण्याचा हव्यास धरतात. पण तिची सततची साथ मिळविण्यासाठी जीव आटवायला फार मोठी निष्ठा लागते. ती रतिमात्र क्षीण होऊ नये म्हणून असंख्य व्यापातही तुम्ही दक्ष असता, हा तुमचा विशेष मला खरोखरच विलोभनीय वाटतो.

तुमच्या कवितेचे वळण पारंपरिक आहे. पण ती सांकेतिक नाही. त्यामुळे ती परिचित असूनही नवी वाटते आणि तिच्याशी आपला चटकन स्नेह जमतो. तुमच्या घडणीच्या काळात गोविंदाग्रजांचा जो खोल ठसा तुमच्या कोवळया कविमनावर झाला असेल तो कधी कधी चमत्कृति आणि कल्पनाविलास यांच्या रूपाने उचल खातो. पण या ठशावर मात करून जेव्हां तुमचे स्वतंत्र व्यक्तिमत्व स्वतःचा सौंदर्यानुभव आणि स्वतःचा

जीवनानुभव स्वतःच्या खास शैलीत बोलू लागतो तेव्हां तुमच्या कवितेला आगळी–वेगळी रसमयता प्राप्त होते. आशयाला साजेशी सहजसुभग शब्द-कळा ती धारण करते. तिची चाल वृत्तांच्या पैंजणात अवघडत नाही; उलट त्यांच्यामुळे तिच्या पदविन्यासाला रसोत्कर्षक लालित्य येते आणि रसिकाला तिच्या विभ्रमांशी तद्रूप होणे सोपे जाते. सुचलेल्या काव्य-बीजाचा धर्म ओळखून त्याला स्वाभाविकपणे फुलू देण्याचे कसबही तुम्हांला फार चांगले साधले आहे. कविता खेळवता खेळवता जीवनाचे एखादे सूत्र किंवा सिद्धांत तुम्ही सहज सांगून जाता, आणि ते अशा चातुर्याने की तिचा रसोत्कर्षक व्हावा आणि तिला तलस्पर्शित्व यावे. कवितासाधनेतील ही एक सिद्धीच आहे. म्हणून श्री शारदा आपल्याला अजून प्रसन्न होत नाही अशा अर्थाचे तुमचे उद्‌गार तुमच्या आर्ततेच्या संदर्भापुरतेच खरे आहेत ती तुम्हाला प्रसन्न असल्याची साक्ष मला तुमच्या कितीतरी कवितांतून मिळाली आहे.

उदाहरणार्थ : "आमंत्रणे गेली वाया," "मन माझे वेडे हे," "तुझ्या गावचा वारा," "हृदया," "असा धटिंगण," "आला आषाढीचा वारा," "अखेर आहे जळावयाचे," "पाटलाची लेक," "आमुची तलवारीशी गाठ," "कुबेर," "झाड एकले," "यात्रिका," "कळले मज आज," "जगु दे मज," "ही हिरवी पिवळी शेते," "मराठी बाणा," "आमुची कलंदरांची जात," "अजाण मी," "उजळित मी तम माझे," इत्यादि. कवितेला उद्देशून तुम्हीच म्हटले आहे–

तुझ्यासंगती नित्य धुंदलो
नित्य मखमली शैशव जपिले
तुझ्या कुशीची ऊब लाभता
जीवन अवघे गीतचि झाले

तुमच्या जीवनांत हे जे घडत राहिले, ते सतत वाढत राहो, ही सदिच्छा.

## महाराष्ट्र कवी यशवंत :

या कवितासंग्रहाचे कोणतेही पान उघडा, तिथे पूर्ण रंगून जावे असे मनोहारित्व आढळल्याशिवाय राहणार नाही. मग त्या पानावर आरंभापासूनची कविता आढळो वा आधला-मधलाच परिच्छेद गवसो. मधुविंदूला विलगताना भृंग आदि-अंत का पाहतो ? प्रा. देशपांडे सदाच ताठ मानेने चालत असलेले पाहिले आहेत, आणि नुसती मानच नव्हे तर त्यांचे मनही तसेच आहे. अंतरांत अनंत शल्ये असावीत तथापि हा कवि सारे विष पचवून देखील जुईसम कोमल हृदयाचा आहे याची या कवितातून साक्ष मिळते. कवितेवर त्यांची नितांत श्रद्धा आहे. आपल्या कुशीची ऊब देणाऱ्या सखीसमान ते तिला मानतात. तिच्या नादी लागल्याने 'जे ना भुवनी' 'जे न नभी वा' असल्या आगळया तेजानेही ते जळत आहेत. त्या शारदेच्या चरणी नत-मस्तक राहून भावफुले ते वाहत आहे. आणि ह्यात विशेष श्रेय कोणते म्हणाल तर 'सुमनांची संगत'! 'भिकार, बेचव, अशिष्ठ, ढोंगी, अमंगल, कृत्रिम,' असे जे अवती भवती खचलेले दिसते त्या साऱ्यापेक्षा 'सुमनांची संगत,' हे केव्हढे वैभव आहे, हे केव्हढे समाधान आहे !

इथे मनोरम कवितांचे विविध आविष्कार भरपूर आहेत. '**तुझ्या संगती नित्य धुंदलो ! नित्य मखमली शैशव जपले**' असे जे ते म्हणतात त्याचे चित्रण '**आणि वाटते**' ह्या कवितेत दिसून येते. 'आज कळे' या कवितेतील-

**एकलेचि मम घरटे**<br>
**किलबिल ना कानि कुठे**<br>
**एकाकी हृदय तुटे**<br>
**सांगावे परि कोणा शल्य अंतरीचे**<br>
**आज कळे, आज कळे गूढ जीवनाचे**

ह्या ओळी वाचून कळवळून जाणार नाही असा रसिक विरळा !

'**उजळिन मी तम माझे**' ह्या कवितेतील आत्मप्रत्यय आणि 'जे आहे

ते आहे माझे' ह्यांतील आत्मविश्वास रसिकास पटणारा आहे. 'स्वच्छ चांदणी' ही एक आगळी बंडखोरीची कविता आहे. स्वच्छ\पारदर्शी भाषा असल्यामुळे कुठे घोळ नाही. सर्वत्र अस्खलितपणा आहे. निखालस सुवर्णाचा मधुघटच पुढे आहे. 'क्षणोक्षणि का वधिसी पामरा,' 'आमुची कलंदरांची जात,' अशा एकाहून एक प्रत्ययकारी कवितांचा निर्माता एका हाकेच्या अंतरावर असूनही आजवर तोंडओळखीपेक्षा अधिक ठावा नव्हता. त्याची ह्या कवितासंग्रहाने जवळीक उत्पन्न झाली.

## पद्मश्री अनंत काणेकर :

माझे मित्र प्रा. मा. का. देशपांडे यांच्या या कवितासंग्रहाचे नावच मोठे अन्वर्थक आहे. आपल्या जीवनात काव्याला किती आगळे महत्त्व आहे हे कवीने अनेक वेळा हळुवारपणे सांगितले आहे. जीवनातले भलेबुरे अनुभव पचविताना म्हणा, किंवा संकटांना तोंड देतांना म्हणा, कवीला विरंगुळा मिळतो तो त्याच्या काव्यसाधनेत. निर्मितीच्या नशेत रंगून जाण्याची आणि स्वतःला हरवून बसण्याची वृत्ती कवीत ओतप्रोत आहे. एके ठिकाणी कवी म्हणतो :

**वेदना आहेत चित्तीं तोवरी बोलून घे,**
**तोवरी गाऊन घे**

या स्वप्नाळू वृत्तीचे उत्तम उदाहरण म्हणजे कवीने मृत्यूला केलेले हृदय-स्पर्शी आवाहन. या कवितेत कवी म्हणतो :

**येशील तरी ते हळूच वायूपरी,**
**ये असाच वाहत शांत सुगंधापरी**
**हलक्या हाती फुलासारखी उघड तावदाने**
**आणि ये चोरपावलाने....**

आईविषयीची एखादी करुण आठवण, बाळपणीच्या गोड स्मृती, प्रेयसी-बरोबर केलेले हितगुज, ईश्वरासंबंधीचे चिंतन—इत्यादि विविध जीवनानुभवातून '**प्रिय कविते**'तील सुंदर कविता स्फुरलेल्या आहेत.

'**प्रिय कविते**'तले काव्य रसिकांना प्रिय होवो हीच इच्छा.

## कविवर्य अनिल :

प्रा. माधव काशिनाथ देशपांडे त्यांचे नाव, इंग्रजीचे कुशल अध्यापन, आंग्लसाहित्याचे व्यासंगी अध्ययन, आणि त्या संस्कारातून केलेले चतुरस्त्र लेखन–ह्या कर्तृत्वामुळे सुपरिचित आहे. ते कविताही लिहितात हे मला ठाऊक नव्हते. तसे म्हटले तर मी कुठेही कविता दिसली की ती पहिल्याने वाचतो. पण प्रा. मा. का. देशपांडे ह्यांच्या कविता वाचल्याचे आठवले नाही. हा माझ्या स्मरणशक्तीचा दोष. मा. का. देशपांडे ह्यांचे पत्र आले की त्यांचे एकावन्नावे पुस्तक म्हणून त्यांच्या कवितांचा '**प्रिय कविते**' नामक संग्रह ते काढीत आहेत. त्यावर 'प्रांजळ छोटेखानी अभिप्राय' मी कळवू शकेन काय ? माझे काव्यकुतूहल जागले. मी तात्काळ होकार कळविला.

संग्रहाची मुद्रिते आली. दिसले की, प्रा. देशपांडे अधून मधून नाहीत तर सातत्याने कविता लिहीत आहेत. आजकालच्या कविता-संग्रहासारखे हे बचखानी पुस्तक होणार नाही तर चांगले २०८ पानाचे होईल. सावकाश अगदी संपूर्ण वाचले ! प्रश्न पडला की, इतक्या कविता लिहून मा. का. देशपांडे कविमंडळात का गाजले नाहीत ? वाटले की, हा संग्रह फार उशिरा प्रकाशित होत आहे.

"आंग्ल – सुधा जरि नित्य प्राशिली
माय मराठी – तिला वंदिले"

(पान १३८) अशा स्पृहणीय स्वभाषा – प्रेमातून ह्या रचनांचा उद्‌गम झाला आहे. कविता करणे हा प्रा. मा. का. देशपांडे ह्याच्या जिवाचा विरंगुळा आहे. 'प्रिय कविते'च्या सहवासात ते नित्य रंगतात.

**प्रतिभे, कोण रानची परी ?**
**सांग तू कोण रानची परी,**
**कसे ओळखू तुला,**
**कशी तू संचरशी भूवरी**
**कसे रंजवू तुला**
**कळेना कसे आळवू तरी ?**

कसे बोलवू तुला रमाया माझ्या गीतांतरी ?" (पान १६)

ह्या प्रश्नांत ते गुंगतात आणि शारदेच्या पूजनासाठी

जरी जमेना हार कराया
परी अहा ! सुमनांची संगत (पान ५६)

अशा समाधानात असतात. कवितेसंबंधीच्या निजवृत्तीविषयी असे बोलके उल्लेख त्यांच्या कवितेत बऱ्याच ठिकाणी आहेत.

मा. का. देशपांडे यांनी कवितालेखनाला सुरुवात केव्हा केली ? कवितांचे लेखनकाल दिले असते तर बरे झाले असते. केवल रसिकाला त्याची आवश्यकता नसेल, पण अभ्यासी रसिकाला आहेच. प्रा. देशपांडे म्हणतात, "काव्य संपता जीवनांतले, मी झालो कवि, झालो मी कवि, लेखणीतुनी काव्य जन्मले, काव्य संपता जीवनांतले." (पान ६९-७०) हे कसे होऊ शकते ?

"न कळे मज काव्य मला कवि नाही व्हायाचे,
रचित शब्दशब्द उगा क्षण ना दवडायाचे
जगण्याचे वेड मला, वेड मला जगण्याचे
जगतो मी काव्य, मला कवि नाही व्हायाचे" (पान १५७)

असाही उद्‌गार निघतो. मला वाटते हा एक कवीच्या संवेदनाशीलतेचा विरोध-विकास असावा. पण कविता लिहिण्यापेक्षा काव्य जगणे श्रेष्ठ ह्या मा. का. देशपांडे ह्यांच्या जाणीवेशी माझी जाणीव शंभर टक्के जुळते.

तरी पण मा. का. देशपांडे ह्यांना कवितेची एक गूढ अनाकलनीय ओढ आहे हे त्यांच्या कवितातून दिसते. ते म्हणतात.

गेली वेडे सारी सारी,
जीवनाला गेले तडे,
काव्य वेड का न जाई ?
तुज कळायचे नाही,
कळायचे तुज नाही (पान १८४).

छंदांचा दोषरहित वापर आणि भाषेचा सरळसाधेपणा पाहिला म्हणजे प्रा. देशपांडे सिद्धहस्त कवि आहेत हे जाणवते. रचनाप्रकारांतही विविधता

आहे. संग्रहातल्या सहा कविता चौदा ओळींच्या आहेत. ही रचना आपापत: चौदा ओळींची आहे की हा एक सुनीताचा वेगळा प्रयोग आहे हा प्रश्न पडू शकेल.

ह्या संग्रहांतल्या सर्व कविता मी एका विशेष आवडीने वाचल्या. मला मराठी कवितेने गेल्या चाळीस वर्षांत पाडलेल्या काही पायवाटावर पुन्हा चालून गेल्याच्या ओळखीचा आनंद झाला. तसाच तो रसिकानांही होईल. कवितेच्या प्रभा बहुत आणि रसिकांच्या आवडीचे प्रकार अनेक. जी कविता एकाला खूप आवडते ती दुसऱ्या कुणाला आवडत नाही. आवडी-नावडीची कारणे ही भिन्न भिन्न असतात. तेव्हा कवितेचे मूल्यमापन कोणी आणि कसे करावयाचे? समीक्षक करोत; मी समीक्षक नाही.

## प्रा. देशपांडे यांचे निवडक ग्रंथ

1. A Dictionary of Idioms and Phrases.
2. A Dictionary of Quotations and Proverbs.
3. Marathi – English Dictionary.
4. A Dictionary of Correct English.
5. English Pronunciation.
6. J. Nehru–A Study in Personality.
7. English – Marathi – English–Dictionary.
8. Art of English Conversation.
9. English for Ladies.
10. Art of English Letter – Writing.
11. English in Six Months.
12 English for Commerce.
13. A Senior English Grammar and Composition.
14. A Junior English Grammar and Composition.
15 Art of Translation.
16. Mind your English.

१७ साहित्य – साधना (साहित्य तत्त्वे).

१८. भाषांतर – कला

१९. नवी फुले (काव्य).

२०. प्रिय कविते (काव्य)

२१. मुक्तता (कादंबरी)

२२. प्रवाह (कादंबरी)

२३. आधार (कादंबरी)

२४. वंचना (कथा)

२५. मंगला (कथा)

२६. पहिला पगार (कथा)
२७. घम्रतरंग (गुजगोष्टी)
२८. कादंबरीकार फडके (टीका)
२९. केळकर (टीका).
३०. माडखोलकर (टीका).
३१. नेहरू – विचार आणि व्यक्तिमत्त्व.
३२. हसत खेळत इंग्रजी.
३३. हसत खेळत इंग्लिश ग्रामर.
३४. अत्रे (टीका)
३५. नवे भाषांतर (भाग १ ला)
३६. नवे भाषांतर (भाग २ रा)
३७. संत आणि सायन्स.
३८. खांडेकर ( टीका )
३९. प्रो. फडके – चरित्र आणि वाङ्मय.
४०. फडके – वाङ्मय – दर्शन.

### आगामी :

१. आनंदाचे झरे (काव्य–संग्रह)
२. संत आणि सत्य
३. इंग्लिश वाङ्मयाचा इतिहास.
4. Principles of Literary Criticism.
5. Indira Gandhi : The Years of Glory.

# अनुक्रमणिका


| कविता | पान |
|---|---|
| १. प्रिय कविते | २ |
| २. कुणी लाविला नांद | ५ |
| ३. तोचमार्ग | ७ |
| ४. आमंत्रणे गेली वाया | ८ |
| ५. अजुनि प्रभू मी उणा | ९ |
| ६. पांखरांचीशाळा | ११ |
| ७. बनवुनी टाक सुगंध मला | १३ |
| ८. मन माझे वेडे हे | १४ |
| ९. प्रतिभे | १६ |
| १०. देखता तुझ्या हास्याते | १७ |
| ११. आणि वाटते | २० |
| १२. पेटला आहे निखारा | २४ |
| १३. तुझ्यां गावचा वारा | २६ |
| १४. ही माती आता | २८ |
| १५. हृदया | ३० |
| १६. असा धटिंगण | ३१ |
| १७. पैलतीर | ३३ |
| १८. ना जवळी येणार | ३६ |
| १९. आला आषाढीचा वारा | ३७ |
| २०. हे हृदय जळू दे | ४३ |
| २१. घरि माझ्या जमती चोर गडे | ४५ |
| २२. सापडे वाट न अजुनी | ४७ |
| २३. पुरे जाहली ताठर भाषा | ४९ |
| २४. भास्करा | ५१ |
| २५. स्वप्नात राहु दे जीव पुरा | ५३ |

२६. कुठे ? ५४
२७. शारदे ५५
२८. अखेर आहे जळावयाचे ५७
२९. काव्यपाहिजे ? ५८
३०. गंध आहे ५९
३१. ठरले तू येणार ६०
३२ वेडे पिशाच्च ६२
३३. लाखाची दौलत ६३
३४. पाटलाची लेक ६५
३५. क्षणाक्षणाला ६६
३६. आमुची तलवारीशी गाठ ६७
३७. काव्य संपता ६९
३८. मज कळेना ७१
३९. कुबेर ७३
४०. झाड एकले ७५
४१. यात्रिका ७९
४२. जारि भृंग ८२
४३. काव्य-खुळी ८४
४४. चालले प्रेत ८६
४५. जादूगार तू ८८
४६. असाचआलो वाहत वाहत ९०
४७. सुगंधा ९२
४८. नेत्र असे ९३
४९. जरी यायचे ये तरि कोमल ९४
५०. कळते मज आज ९६
५१. जगु दें मज ९८
५२. रात्र ही १००
५३. का ? १०२
५४. ईश्वरा १०४
५५. येशी भर वादळांत १०७

५६. ही हिरवी–पिवळी शेते १०९
५७. या अशाच कातरवेळी ११०
५८. किडयांचे गाणें १११
५९. आठवतो काळ खुळा ११२
६०. तो क्षण ११४
६१. काळया काळया नभीं ११५
६२. मी वेडी ११७
६३. मराठी बाणा ११९
६४. शारदे, अखेरची गांठ १२१
६५. आमुची कलंदरांची जात १२४
६६. क्षणोक्षणी का वधिसी पामरा ? १२६
६७. अजाण मी १२८
६८. मराठी भाकर १३०
६९. चोर कुठे नाही १३१
७०. धीर होत नाही १३३
७१. स्वच्छ चांदणी १३५
७२. आज कळे १३६
७३. कोण खरा मी ? १३७
७४. ये चंचलते १४०
७५. उजळिन मी तम माझे १४२
७६. मी मुग्ध किशोरी होते १४४
७७. येइ उजळित ज्योत १४५
७८. आसवे १४६
७९. नको झुरू प्राणा १४८
८०. नको डोकवू १४९
८१. कळेना कसे आवरू आसवांना १५०
८२. बी अ गुड् बॉय् ! १५२
८३. ये राणी तूं अशी घरी १५३
८४. रोज नवी नवीकळी १५४
८५. हे अश्रू १५५

८६. सारा अधार अधार १५६
८७. मला कवि नाही व्हायाचे १५७
८८. नको धरूं पंख माझे १५८
८९. चार क्षणांचा खेळ गडे १५९
९०. दूरपणांतचि १६०
९१. आसवांत भिजलेले ते स्मित १६२
९२. घराघरांतुनि जळती सीता १६३
९३. येई पहांटचा तारा १६५
९४. सजा जाहली १६६
९५. पहांटच्या अंधारीं १७०
९६. ऍकिलेस का १७४
९७. सभ्य माणसे आम्ही १७५
९८. एकदा भेटून जा १८१
९९. तुज कळायचे नाही १८३
१००. नवल १८५
१०१. माझी रीत १८७
१०२. झोपले बाळ माझे १८८
१०३. तू जलद दयेचा १८९
१०४. घे उंच भरारी, १९१
१०५. तो स्पर्श ! १९२
१०६. कोण बरे हा ? १९४
१०७. अमृतघट १९५
१०८. असा तू अद्भुत जादूगार १९६
१०९. रामू दाते—! १९७
११०. लावण्याची कळी २०२
१११. काय रुचे मज ? ४२०
११२. आजार २०६
११३. मागे वळुनी २०७
११४. जे आहे ते आहे माझे २०८

# प्रिय कविते

माधव का० देशपांडे

# प्रिय कविते,

प्रिय कविते, मम मूढ जीवना
साथ लाभता तुझी सुमंगल
गन्धित झाले अवघे जीवित
हृदय जुईसम तसे सुकोमल

किती वादळे आली गेली
किती विजेचे घाव सोशिले,
तुझ्या संगतीं परी, देवते,
हांसत हांसत जहर पचविले

तव सहवासीं नित्य रंगलो,
जरी भंगली स्वप्ने सारी
कृपाप्रसादे तुझ्या लाभले
कण तेजाचे नित अंधारीं

रम्य तुझा सहवास लाभता
अमृतमय जे तेच प्राशिले,
थोर तुझा आदेश लाभता
जे मंगलमय तेच वन्दिले

आणि हरपता मातृदेवता
प्राण भंगला, परी माउली
तूच नव्हे कां पुसुनि आंसवे
धीर दिला मज जवळ घेउनी ?

तव मंगल सहवास लाभता
मानिले न विभ्रम कलिकांचे
तुझ्या सुधेचा थेम्ब लाभता
वाधले न विष जननिन्देचे

तुलाच कळली प्रथम, देवते,
नव स्वप्नांची अंधुक चाहुल,
तुला न पुसता परि न टाकिले
भावसंगरीं वेडे पाउल

तुलाच कथिली, विश्व-मोहिनी
या हृदयीची गुपिते सारी
तुझ्याच चरणांवरी वाहिली
काळजातली शल्ये सारी

आणि अंतरीं असाच केव्हा
चन्द्र हांसता नव-प्रीतीचा
तुझ्याच कंठीं प्रथम अर्पिला
हार नव्हे कां भाव-फुलांचा ?

तुझ्या संगतीं नित्य धुंदलो,
नित्य मख्मली शैशव जपिले
तुझ्या कुशीची ऊब लाभता
जीवन अवघे गीतचि झाले.

# कुणी लाविला नाद

कुणी लाविला नाद खुळा हा
तुला, जीवना, हा काव्याचा ?
दूरदूरची स्वप्ने हेरित
झुरावयाचा, सलावयाचा ?

कधी न गवसे जे नयनाते
उगाच अपुला ध्यास तयाचा
मूढ मृगासम शोधित काही
सुगंध चंचल पकडायाचा ?

अबोध जे जे, सुदूर जे जे
वेड निरंतर त्या ज्वालेचे
त्या अग्नीने हृदय पेटता
हासत हासत जळावयाचे

त्या हास्यातून फुलता पुष्पे
रसिकांस्तव त्या गुंफायाचे
पुष्पहार तो कुणा न रुचता
तडे मनाचे मोजायाचे

कुणी लाविला नाद असा हा
मनात शल्ये जपावयाचा,
ना, जे भुवनीं, जे न नभीं वा
त्या तेजाने जळावयाचा ?

## तोच मार्ग

याच मार्गाने मजेने हिंडलो अन् खेळलो
संगतीं तुझ्या धरोनी हात, आई, नाचलो
याच मार्गे अन् कितीदां गाठले, आई, तुला
याच मार्गी चालतांना भेटशी, आई, मला
वेळ होता आणि केव्हां यावया शाळेतुनी
धावसी बाळा बघाया, अश्रुधारा लोचनीं
आठवे, मी रूष्ट होता, घेउनी जाशी सवें
हट्ट बाळाचा म्हणोनी, घ्यावया जे जे नवे
त्याच मार्गे गे अखेरी घेउनी गेलो तुला
कोवळ्या, नाजूक देहा स्फुन्दतां अग्नी दिला
लाभला ठेवा म्हणोनी कौतुके अग्नी हंसे
देह गेला तो जळोनी – फूल जाईचे जसे
घेऊनी अस्थी तुझ्या अन् त्याच मार्गे चाललो
घेतली फोडून छाती, स्फुन्दलो, आक्रोशलो
—त्याच मार्गी आणि आता धीर देतांना मना
काय वाटे, काय होई काळजा, सांगूं कुणा ?

# आमंत्रणे गेली वाया

काही वाहीच मागतो – भारी हट्टी माझा तान्हा
दिसे पहाटचा तारा – परी जागा माझा कान्हा...
ये ग हम्मा, ये ग हम्मा – संगे घेऊन वासरू
दोस्त मागते खेळाया – वेडे माझे हे कोकरू...
ये ग माऊ, ये ग माऊ, – लाल जिभली दावाया
तुझ्या मऊ मऊ मिशा – बाळ मागते पिळाया..
ये रे टॉमी, ये रे टॉमी – तुझे गोरे गोरे अंग
घोडा मागतो बसाया – माग–मागतो श्रीरंग...
ये रे चंद्रा, ये रे चंद्रा, – दूध आण चांदण्यांचे
न्हाण आवडे छोनुल्या – याच हासऱ्या पाण्याचे ..
चुम्बूनिया जाई-जुई, – ये रे ये रे वायुराया
आण फाया अत्तराचा – माझ्या चिंगुल्याला द्याया...
ये रे राघू, ये रे राघू – वनातून गात काही,
जीव आला मेताकुटी – झोप बाळा नाही नाही...
थांवा! थांवा! ! नको घाई – डोळे लागले मिटाया,
नीज आली ग आली ग – **आमंत्रणे गेली वाया** ..! ...

# अजुनि, प्रभू मी उणा ....!

अजुनि प्रभू मी उणा
अजुनि जमेना गीत गावया तान छेडिल्याविना,
गंध फुलांचा रूचे न चित्ता तया तोडल्याविना,
अजुनि, प्रभू, मी उणा

गोडधडाविण अजुनि न गोडी येइ माझिया सणा,
आणि रूचेना दान कराया जगा दाविल्याविना,
अजुनि प्रभू मी उणा

अजुनि निंदका पूजायाची होई ना वासना
आणि अनाथा हृदीं घ्यावया होई ना कामना,
अजुनि, प्रभू मी उणा

अजुनि जमेना राखायाला अब्रू वस्त्राविना,
आणि मनाचे तडे न कळती अश्रु देखिल्याविणा
अजुनि, प्रभू मी उणा

प्रेम-भावना गमे अमंगळ वैदिक मंत्राविना,
पतितांच्या हृदयातिल ईश्वर नावडतो पूजना,
अजुनि, प्रभू मी उणा

वनावनांतून फुलाफुलांतुन तव श्वासाच्या खुणा,
परी ना कळे रूप तुझे, प्रभु, मूर्ति देखिल्याविणा,
असा असा मी उणा,
प्रभुजी, अजुनी पुरा मी उणा

## पाखरांची शाळा

माझ्या अंगणी ग भरे, रोज पाखरांची शाळा,
नको आवाज घंटेचा, नित्य नेमे होती गोळा...
फौजी शिस्त बाणे अंगीं, नाही वर्गात गोधळ,
बाळे फारच गुणाची, नाही तंटा ना वादळ...
नाही गायनाचे गुरु, परि गाती आनंदाने,
दरवळे माझी बाग, नित्य मधाळ गळ्याने..
कशी तुरुतुरु चाल, कैसा मानेचा तो डौल,
लाल जिभेवरी अहा ! नित्य साखरेचे बोल...
हळूहळू येती आत, पाय नाही वाजायाचे,
भुर्र आकाशीं उड्डाण, पाय वाजता कोणाचे..
भारी स्वच्छ बाई पोरे, नाही खपायची घाण,
मऊ मऊ पिसामाजीं, नित्य फिरे चोच सान
खेट–खेटून बैसता, काय सांगती ग गडे,
काय बोलती कळेना, कैसे सोडवावे कोडे ?
काय सांगती प्रेमाने, अंतरीचे गोड गुज ?
गोड गुपित चालता, नेत्रामाजी खेळे वीज...

वाटे कळावी कळावी, बोलणी ती गूढ सारी,
भाषा शिकायाते जाऊ, कोणा ज्ञानीयाच्या घरी? ...
याहो, याहो, मुनिराया, लावा अर्थ या वाणीचा,
मग सांगेन म्हणते, अर्थ जगाच्या शाळेचा...

माधव का. देशपांडे

## बनवुनी टाक सुगंध मला

बनवुनी टाक सुगंध मला,
मला रमू दे, मला रमू दे, नित सुमनांच्या गळां
तू विश्वंभर, तव सामर्थ्या नच तुला,
रे तूच फुलविला ना विश्वाचा कळा ?
नवरंग नभाचे ! – अहा ! दिव्य तव कला
मूढ हट्ट हा वेडा अगदी जरी जगावेगळा,
वनवुनी टाक सुगंध मला
मज ठेव, अनंता, जाइजुईच्या उरीं
दे पाठवुनी मज निशिगंधाच्या घरीं
वां प्राजक्ताच्या कोमल कोमल करीं
फुलफुलातुन रमावयाचा छंद मला आगळा
बनवुनी टाक सुगंध मला
मी वसेन लपुनी नवकलिकेच्या घरीं
परि पहाट होता येइन दारावरी
अन् स्वार होउनी अलगद वायूवरी
मनामनातुन जाइन पिकवित आनंदाचा मळा
बनवुनी टाक सुगंध मला

## मन माझे वेडे हे

मन माझे वेडे हे त्या कळे न काही
जे अनुपम, चिरमंगल प्राण तिथे वाही.
रात्रंदिन करि उपास
अन्नाची त्या न आस
झिडकारी गोड घास
म्हणते 'दे अमृत,' वा नको काहि काही
मन माझे वेडे हे त्या कळे न काही...
ध्यास तया तेजाचा
नील नभीं रमण्याचा
जे न कुठे परि त्याचा,
नवल किती सांगावे, नको तिथे जाई
मन माझे वेडे हे – त्या कळे न काही...
क्षितिजाचे रंग नवे
चुंबाया जाइ जवे
चंद्रपुष्प त्यास हवे
सूर्यबिंब कवळाया रूसुनि वसे, वाई,
मन माझे वेडे हे – त्या कळे न काही...

□ □ □ माधव का. देशपांडे

न कळे त्या काय सले
अंतरात काय जळे
का झुरते सतत खुळे
रात्रंदिन चैन न त्या, एकलेच राही
मन माझे वेडे हे – त्या कळे न काही...
खुलवू मी त्यास कसे ?
आनंदे फुलवु तसे
का जडले गूढ पिसे ?
वाटे मज मरण बरे, सहन होत नाही
मन माझे वेडे हे – त्या कळे न काही...

## प्रतिभे

प्रतिभे, कोण रानची परी,
सांग तू कोण रानची परी ?
कसे ओळखू तुला, कशी तूं संचरशी भूवरी ?
काय फुलांच्या उरी झोपल्या शांत सुगंधापरी,
नातरी दाहक ज्वालेपरी ?
पृथ्वीच्या गर्भातिल अथवा गुप्त निर्झरापरी,
मुक्त वा हास्यलकेरीपरी ?
गर्जत गर्जत रूष्ट वादळी झंझावातापरी,
शांत वा फूलपाखरापरी ?
पंख चिमुकले पसरित अथवा रानपाखरापरी,
दुष्ट वा सागरलाटेपरी ?
बालमनांतिल मुग्धमनोहर अबोध स्वप्नापरी,
निस्तुले, वावरशी भूवरी ?
कसे रंजवू तुला, कळेना कसे आळवू तरी,
कसे बोलवू तुला रमाया माझ्या गीतान्तरीं ?

# देखता तुझ्या हास्याते

देखता तुझ्या हास्याते
जाहलो अचानक मूढ
वाकलो जरासा कानीं
जाणण्या मनीचे गूढ

परि हास्य न बोले काही
उलगडा न हो कोडयाचा
वाटले अता देखावा
आरसा दोन नेत्रांचा

नेत्रास नेत्र भिडवोनीं
टाकिला प्रश्न एकान्ती
परि जबाव काही नाही
लाभले न काही अन्ती

गाठिता परी सन्मित्रा
जो पूर्ण जाणिजे शास्त्र
बोलला : " उत्तरासाठी
का कुणी ठेविते वस्त्र ? "

ते मर्म अन्तरीं ठसले
शंका न उरे अणुमात्र
वाटले पाहिजे केले
एकेक मोकळे गात्र

चुम्बुनी उरोभागाते
टाकिला तयाते प्रश्न
परि मुके यंत्र बोलेना
जाहलो जास्त बेचैन

वाटले अता हे कोडे
जाणाया एकच मार्ग
संपूर्ण उत्तरासाठी
देखिला पाहिजे "स्वर्ग"

वाढत्या धिटाईमाजी
मोकळे पूर्ण तुज केले
घेतले आणि प्राशोनी
घटघटा सुधेचे प्याले

ते शिल्प स्वच्छ चान्दीचे
परि मुकेच अपुले राही
भागलो वाट पाहोनी
परि उत्तर अजुनी नाही

# आणि वाटते,

आणि वाटते कधी अचानक
प्रौढपणाचे फेकित ओझे
अन् झिडकारित जीर्ण लक्तरे
बाळपणीचे व्हावे राजे...

डुंबत डुंबत अंग न पुसता
मस्त पडावे तसेच मातित
अन् हिंडावे इकडे तिकडे
उगाच आपुले हासत हासत...

आणि निघावे शाळेमाजी
पाटी-पेन्सिल त्रास न असला
नदीकाठच्या उंच वडावर
भरवावी छोटीसी शाळा...

टॉमी तो केसाळ शिपाई
राखण करण्या सदैव राजी
खडा उभा परजीत शेपटी
शिस्त पाहिजे शाळेमाजी...

संगीताचा तास घ्यावया
गायन-मास्तर येई राघू
साथ तयांते अचुक द्यावया
घुबड गातसे ‘ घू, घू, घू, घू...

गणित जमावे नीट म्हणुनी
फांदीवर फौजी शिस्तीने
गाति परवचा चूक न करता
पहा पाखरे गोड गळ्याने...

ये शाळेला भेट द्यावया
साळू-मैना बडे पाहुणे
स्वागत त्यांचे खास कराया
गाई गर्दभ मंजुळ गाणे...

काकराज गंभीर मुखाने
इन्स्पेक्शन घेण्याते येती,
परी शिपाई जरा भुंकता
इन्स्पेक्टर सूंबाल्या करती...

दूर दिसे झुडुपावर कोठे
फुलपाखरू गोजिरवाणे
रंग मनोहर किती अहाहा !
रंगविले त्या कुणी ब्रशाने ? ...

शिस्त उरावी कशी वरे ती
असे पाहता कोमल सोने ?
सरली शाळा, सुटले गोकुळ...
पकडाया प्रभुजीचे लेणे..

धाव धावता असे यापरी
कळ्याकळ्यातुन दर्शन प्रभुचे
लुटावयाचे राज्य फुलांचे
वेचित वेचित कण भाग्याचे...

अशी आवडे नामी शाळा
जिला न भिंती आणि इमारत.
कुंभ जिथे नित नवज्ञानाचे
सज्ज सदा वितराया अमृत...

हाय् ! संपली सुंदर शाळा,
अता नशिबी ये गोशाळा
आयु चालले वाया वाया
राव रावता पोट भराया...

# पेटला आहे निखारा

पेटला आहे निखारा, तोवरी साधून घे
तोवरी साधून घे
रे विकासावीण नाही मौज काही आगळी
जीवना साफल्य येई, पुष्पिते जेव्हा कळी
सांडतो पर्जन्य दारी, तोवरी न्हाऊन घे
तोवरी प्राशून घे…

कोण मानी, कोण जाणी गंध पुष्पा ना जरी ?
सौरभावाचून ठेवी कोण कोणा अंतरीं ?
कस्तुरीचा गंध देहा जोवरी स्पर्शून घे
तोवरी रंगून घे…

ही फुलांची जात वेडी-मान घेती आगळा
वेचिल्यावाचून नाही देह कोणा अर्पिला
अंगणीं आली रमाया, तोवरी वेचून घे
तोवरी चुम्बून घे…

साधनेवाचून कोणी जीवनाते जाणिले ?
वेदनेवाचून कोणी भैरवीते गायिले ?

☐ ☐ ☐ **माधव का. देशपांडे**

वेदना आहेत चित्ती, तोवरी बोलून घे
तोवरी गाऊन घे...

आसवावाचून कोणी का कधीहि हर्षले ?
हासल्यावाचून प्रेमे, अश्रु कोणी वर्षिले ?
हासरे आहेत अश्रू-तोवरी हासून घे
तोवरी हासून घे...

# तुझ्या गावचा वारा

टाळित होतो पायवाट ती, विसराया पट सारा
तो अंगाला हळुच विलगला तुझ्या गांवचा वारा
जरी न वाजे पाउल, सहजचि ओळखिले मी चोरा
होता परिचित स्पर्श, मुखीचा गन्धहि तैसा न्यारा
ठाउक होती तऱ्हा तयाची, उगाच जाता जाता
विलगायाचे नकळत, लावित हळूच अत्तर हाता
थाम्बवुनी मज वदे, " निघाला कुठे, कोणत्या गावा ?
काय भंगला इतुक्या लवकर जुना लाडका पावा ?
आठवते का रात्र चान्दणी ? —जरा आठवा माळा
जिथे लाडके गुपित चालता, मीच पहारा केला !
जरा आठवा निळा सावळा झरा—मोकळी स्नाने
जिथे झाकिले दो वेड्यांना मी अपुल्या वस्त्राने !
—आणि पोहता, उगाच तुमचे जरा विनसले होते
आठवते का मौज ? कसे मी दिले जमवुनी नाते ?
जळी टाकुनी पाय बैसता, सवे घेउनी राणी
साखरचुम्बा कुणी पाहिला ? दिला कुणाला कोणी ?

☐ ☐ ☐ माधव का देशपांडे

—अताच का मग मनीं आपुल्या आले काळेबेरे ?
तुटती का परि तोडतोडिता असले धागेदोरे ?
जा तरि आता, असे वळोनी, वांधावरच्या वाटे
नको कथाया तुम्हा, राहते कुठे कुणाचे नाते !"
—असेच काही सांगत गेला जुना भावडा वारा,
कसे कळावे तया —वदलला तुझ्या गावचा वारा !

## ही माती आतां

ही माती आता तुझ्या करीं
घे प्रेमभरे वा फेक दुरी ।।
तुझेच लीला-लाघव सारे
तुझ्याच श्वासें विश्व हे स्फुरे
तुझीच जादू ! – गोल हा फिरे
का रोष मात्र मृत्तिकेवरी ?
नील नभावर तुझी कुंचली,
रंग अर्पिशी उषा-कपोलीं
गन्ध सुमाते–तुझीच केली,
का चार कणांचा भार उरीं ?
रक्षा-पात्र बनो, मधुघट वा
वा भिक्षेचे पात्र नाचवा
ना तरि नामी चूल पेटवा
उपयोगा यावी कशी तरी
आकारित तव स्पर्शे व्हावी
गन्धमया तिज तूंच करावी
नवचैतन्ये वा स्फुरवावी
घुमवावी अथवा दिव्य स्वरीं

□ □ □ **माधव का. देशपांडे**

—ना तरि दे उधळोनी कोठे
चार कणांचे ओझे छोटे
जाऊं दे मज आल्या वाटे
मग भार न माझा तुझ्यावरी

## हृदया

वदोत कोणी कसे, थांववी कोण कुणाच्या मुखा ?
पुरे पुरे हे पटले, हृदया, तूंच एकला सखा !

कोण जाणतो कुणा, कळाव्या कशा कुणा यातना ?
अचूक जाणी, या बाजारीं, कोण कुणाच्या मना ?

अखंड वाहे विनोदगंगा माझ्या हंसऱ्या घरीं
तुलाच ठावे कशा लपवितों दु:खाश्रूंच्या सरी

जरी सदोदित फुले मुखावर नवहास्याची कळी
तूंच जाणिसी, सखया, माझ्या अन्तरिची पोकळी

जरी सभोंतीं सदा पसरले सन्मित्रांचे कडे
तूंच देखिले कसे चित्त ते एकलकोण्डे रडे

–मौज जगाची अशी, खरोखर कोण जाणतो कुणा ?
तुलाच ठाव्या, हृदया, माझ्या कांटेरी वेदना

# असा धटिंगण

असा धटिंगण सांग, सखे, कां कुणी देखिला कधी ?
अचूक येई छळाछळाया साखरझोपेमधीं·
दिसावयाचा कधी न दिवसा, पहाट होता परी
रोज पहावे तो स्वारीचे मस्तक छातीवरी !
किती कथावे अवखळ चाळे वेडेविद्रे तरी
क्षणाक्षणाला नवीन खोडी आणि वाकुल्या वरी
उगाच हासे कधी ठेउनी अधरावर बांसरी
कळे न येई शीळ कुठोनी, करी मला वावरी
हंसे कधी खदखदा—झडकरी दीप लाविता परी
जणू वाहता सुगंध जाई विरुनी वाऱ्यावरी
कधी कधी वाजवी मनोहर वीणा कोठे तरी
आणि मनाच्या छेडित तारा लपे खोल अंतरीं
कधी होउनी स्वार मनावर दौडत जाई दुरी
खरा कसाई ! हांसत ठेवी सुरी काळजावरी
जात गडे पुरुषांची ! – अगदी लाज टाकिली पुरी
रोखरोखती लवाड डोळे, माता जवळी जरी

कधी कधी दांडगा सरकतो असाच शय्येवरी
हळूंच दुलईमधे घुसोनी ओढी मजला करी
चुम्बित चुम्बित नेत्रा, ठेवी ओठहि ओठांवरी
आणि अंगुली वात्रट शोधे हळूच कांही तरी.
—असा धटिंगण सांग, सखे, का कुणी पाहिला कधी ?
छळले कोणी असे कुणा कां साखरझोपेमधी ?

# पैलतीर

पैलतीरीच्या अन्धारीं
डोकावते वाटे कोणी
" पुरे झाला खेळ आता "
म्हणतसे खुणावोनीं

कधी वाटे घ्यावी झेप
गाठायाते पैलतीरा
धीर होईना टाकाया
पाण्यामाजीं पाय जरा

ऐलतीरी खेळायाला
खेळण्यांची गर्दी, बाई !
जीव गुन्तला तयांत
पाय उचलत नाही

लाडी माझी बाहुली ती
वेळावते कशा माना
उद्या लगीन थाटाचे
आमन्त्रणे गेलीत ना !

नवे नवे फुगे चार
कालच ना आणियेले ?
उडवाया, फुगवाया
अजुनी ना काढियेले.

करायाची भातुकली
जंगी आहे मेजवानी
खाता खाता हंसायाचे
म्हणायाची गोड गाणी

खेळायाचा घोडा घोडा
काठी घेउनी वाकडी
खावयाचे पेढे, वर्फी
तशी मावळी काकडी.

शंखशिपल्यांची रास
फक्त माझ्या मालकीची
आस काही काही केल्या
जात नाही दौलतीची.

पैलतीरी बोले कोणी
आवाज तो ओळखीचा
" पुरे झाले आता वेड
छन्द पुरे खेळण्याचा ! "

काय करावे कळेना
ऐलतीर लागे गोड !
वेड्यावाणी गत, बाई
पैलतीराचेहि वेड ! !

# ना जवळी येणार

जिवलगा, ना जवळी येणार,
जरि न जपले मी मजलागी कोण मला जपणार ?
रविकिरणांच्या सवे अचानक क्षण तुजला दिसणार,
अनंत रूपे घेत भोवती गुंजारव करणार,
परंतु ना जवळी येणार.
दंवबिन्दूच्या शांत दर्पणीं तुज दर्शन देणार
मंद वायुच्या लपून मागे तुज पाहुन घेणार,
सुमगंधांतुन क्षण डोकावुन दूर दूर पळणार,
परंतु ना जवळी येणार.
गान–लकेरीतुनी कधी तव नेत्र अहा ! वघणार,
कधी वनोनी स्वप्न मनोहर तव हृदयीं वसणार,
चन्द्रकरांच्या मिठीत लपुनी जिवलग शांतविणार,
परंतु ना जवळी येणार.
तव प्रीतीचा ध्यास म्हणोनी वहुरूपी वनणार,
रूप खरे परि दिवसउजेडी ना तुज दाखविणार,
विरता जादू, सरता जादू, कोण मला पुसणार ?
जिवलगा, कोण मला पुसणार ?

# आला आषाढीचा वारा

आला आषाढीचा वारा
आला घेऊन पाऊस
गोड चाखता तो मेवा
झाल्या राघू-मैना खूष

म्हणे मैना, "राघूराया !
किती गोड, गोड पाणी"
पंख दावीत पाचूचे
वदे राघू, "तुझ्यावाणी" !

मैना लाजली, लाजली
आला मोहरून जीव
म्हणे हासत डोळ्यानी
"झाला कवी की हो राव!"

तोंच झाली याद तिला
म्हणे, "ऐकले का राया,
बरे नाही कलिकेला
गेली सुकोनिया काया !

चार झाले दिस आज
घेत नाही अन्नपाणी
घेवोनिया हवे जाया
थोडे औषधाचे पाणी."

लाल चोंच उघडोनी
झाले सज्ज वैद्यराज
चार पावसाचे थेंब
कलिकेला नेती रोज

पंख हालवीत हळू
रोज जाई दवा-पाणी
हळू हळु पिते कळी
साखरेचे थंड पाणी

गोड गोड ते औषध
त्यात होती जादू पुरी,
झाले दोन दिन तोच
जीव आला तिच्या उरीं

आली डोळ्यामाजी वीज
फुटे ओठांवर हसू
दिला रंग कोणी गाला
कसा कसा-नका पुसू !

एक दिनी आली दोघे
भेट द्याया गोरटीला
चोंच लावती चोचीला
पाहताच पोरटीला

गेले होते कळीपण
झाली होती पुष्पाराणी
खेळे गोऱ्या देहातून
आता चैतन्याचे पाणी

होती बोलत वाऱ्याशी
डोल-डोलत प्रेमाने
घर होते भरलेले
सारे सारे सुगंधाने

तोच आला दारीं भृंग
काळे काळे त्याचे तोंड
होता गात धुंद गाणे
साऱ्या मुलुखाचा वांड

घावरोनी धावे दारीं,
थांववीत त्याचे गाणे
म्हणे, "पळ पाहू आता
आज आहेत पाहुणे!"

पुसे मैना चिंतातुर
"कोण आला होता काळा?
नाही लाजच मेल्याला
गात आला, गात गेला!"

वदे हंसोनी लाजरी
"आहे अत्तराचा धनी
तुम्ही वाचविले प्राण
त्याच्या वाहिले चरणीं."

म्हणे मैना, "राघूराया,
घात झाला, झाला पुरा!"
हसे राघू आणि बोले,
"नाही दवा या आजारा!"

"उठा, मैनाराणी आता
वैद्य फक्त गरजेस !
जरी वाया गेली पोर
वाया गेला ना पाऊस !"

आडवीत त्या दोघांना
वदे, "थांबा दोन क्षण,
प्राणदाते तुम्ही माझे
जावे अत्तर घेऊन."

तोच फेंदारित चोच
वदे मैना गोरटीला,
"बाई नको तुझे काही,
फास काळचा चोरट्याला !"

जाता पाहुण्याची ब्याद
येई नाचत भ्रमर
होता बैसला लपोनी
पानामागे विलन्दर

म्हणे चावट हांसोनी
" कोठे आहे हो अत्तर ? "
वेळ होता परी कोणा
द्याया, नको जे उत्तर ?

## हे हृदय जळू दे

हे हृदय जळू दे चितेवरी
रच लाल निखारे नीट वरी

आण लाकडे, आण गोवऱ्या,
रचुनी पेटव गंजी साऱ्या,
घे मदतीला उनाड वाऱ्या
अन् ढकल शठाला तयावरी

उचला कोलित, फुलवा वणवा
काळा काळा धूर साठवा,
अचुक खलाला तयात निजवा
ज्वाळांची संगत तया बरी

क्षणैक मिळता उसन्त त्याते,
दुष्टपणाचे उघडी खाते,
मात्सर्याची पिकवी शेते
रे, कपट दाटले पुरे उरीं

कधी लाभता गुलाबपाणी
कधी पाहता वा मधुराणी

अचूक दावी अपुले पाणी
दण्डिले पाहिजे तया तरी

असेच जळु दे, असेच जळु दे
जळुनी जळुनी राख होउ दे
सोन्याचे कण चार उरू दे
धन उधळिन ते मी जगावरी

# घरि माझ्या जमती चोर, गडे

(मनाचे विसंगत खेळ कुणाला उमगले आहेत ? )

घरि माझ्या जमती चोर, गडे,
कुणि हसे उगा, अन् कुणी रडे

कुणी फेकिती वाटया-ताटे
कुणी उचकिती कडया-कपाटे
कुणी हिण्डते तसेच बेटे !
लाभले लुटाया धन उघडे.

मद्य कुणी, कुणि दूधचि प्राशी,
कुणा कोरडी भाकर खाशी,
कुणी आपुला चाटी फरशी
आवडे राख, कोणा पेढे.

कुणा रुचे कांवळे फाटके
कुणा आवडे वस्त्र नेटके
कुणी दिगंबर फिरे कौतुके
कुणि चूल फुके, कुणि भित चढे.

गात कुणी मौजेने गाणे
कुणी बसे स्फुन्दत रडगाणे
मुके कुणी–नावडे बोलणे,
कुणि घाय मोकलित उगा रडे.

सदा चालला असा तमाशा,
सम्पायाची नाही आशा,
कोठुनि विश्रांतीची भाषा,
हरदिनी छळाया सैन्य खडे.

मालक मी! ––परि सत्ता नाही
पिशाच एकहि ऐकत नाही
एक नव्हे घर–लक्ष घरे ही!
हा खेळ कुणाचा सांग, गडे ?

# सांपडे वाट न अजुनी

रात्रंदिन धांवतो उगाचच इकडेतिकडे खुळा,
सांपडे वाट न अजुनी मला.
जरि छात्र-गणांना मार्ग दावितो सदा
होऊनी हर्ष वन्दिती आदरे पदा
परि कथू कुणाला अंतरिच्या आपदा ?
बसे गुरु अंधारा चावित, प्राशोनी मृगजळा
सांपडे वाट न अजुनी मला
वाचिली पुराणे, कुराण, गीता तशी
शब्दांची कसरत सारी – पडलो फशी
आंधळे भांडती सारे वाऱ्यानिशी
कुणा न ठावे कुठे जायचे–कुठे राहिला मळा,
सांपडे आज न अजुनी मला
गाठिले तज्ञ भेटलो मार्ग–दर्शना,
'द्या प्रकाश थोडा' ऐकविली प्रार्थना
तो फिरवित डोळे विचित्र करिती खुणा
खुणा न कळता धुक्यांत दौडे मूढ उगा एकला
सांपडे वाट न अजुनी मला

वाटले राज-पथ गाठिन मित्रांसवे
दावितील रस्ता नारिजनांचे थवे
वा मार्ग सुखाचा सुंदर मद्यासवे
परी काजवे सारे सारे ! फसे तमीं वावळा,
सांपडे वाट न अजुनी मला
रे, आलो कोठुनि आणि कुठे जायचे ?
ही माती ! —होई काय शेवटी तिचे ?
ही वात विझाल्यावरी तेज कोठचे ?
कुणी न देई जबाब, स्फुंदत मग बसे वेंधळा
सांपडे वाट न अजुनी मला
यापरी जाहले सारे सारे हसे
रे, दमे पांखरु झडली सारी पिसे
हे थकले घोडे, मार्ग परी ना दिसे
का न प्रभो, अंधारी अजुनी रत्नदीप उजळिला
सांपडे वाट केधवा मला ?

# पुरे जाहली ताठर भाषा

पुरे जाहली ताठर भाषा, पुरे मिजाशी हसे
उर्मटापरी असे, राजसे,
मानीशी जगाते नित्य कस्पटापरी
फिदि फिदी हासशी भक्तगणा वरिवरी
बोलसी विषारी बोल–बाण जे उरी
नेत्र विषारी फेकिति ज्वाला कदर कुणाची नसे
उर्मटापरी असे, राजसे
मारुनी विषारी दंश नागिणीपरी
तू स्वैर धावशी झंझावातापरी
वाटते, खेळते वातचक्र तव करीं,
छेदित छेदित लक्ष अंतरे का दाखविशी हसे
उर्मटापरी असे, राजसे ?
परि एक दिनीं तुज जडेल जेव्हा पिसे
जे पिसे नुमगता करी जिवाचे हसे
जे जडता वेडे गणितचि सारे फसे
आणि बैसता घाव जिव्हारी सरेल सारे हसे
सांगतो ऐक तुला, राजसे

मग सरेल उर्मट, उर्मट भाषा पुरी
मग नुरेल गर्वहि क्षणभर ताठर उरीं
बोथटेल अवचित तव नजरेची सुरी
विनम्र हरिणी चरण चुराया धावशील, राजसे
सांगतो धावशील, राजसे

होईल मूक वाचाळ तुझी वैखरी
मग बसेल मिटुनी ओठ तुझी बासरी
दिसणारहि नाही छबी कधी हासरी
दंश मारिता निसर्ग होईल सारे सारे हसे
शब्द हे विसरु नको, राजसे

□ □ □ माधव का. देशपांडे

## भास्करा,

तव सुमनांचा गंध प्राशिता गमले मज भास्करा,*
करावी आपण किमया जरा
गाठिली लिहाया शांत निशा चांदणी
जी रसाळ गीते प्रसवी, कळले जनीं
जी झरा स्फूर्तिचा निर्मितसे कवि-मनीं
सुंदर सुंदर शब्द–सुमांचा करीं ठेविला तुरा
वाटेल स्फुरेल आता गिरा...

वाटले ‘ नववधू ’ वदेल अपुली व्यथा
अन् ‘ जुलमी डोळे ’ सांगतील मधुकथा
उकलाया ‘ कोडे ’ श्रमलो श्रमलो वृथा
‘ कळचा कळचात विहार ’ जमेना हो प्रतिभेचा चुरा
जाहला जीव पुरा वावरा...

परि राखेमाजी उब न येई जरा
हातात न मावे मृत शब्दांचा चुरा
लेखणी प्राण टाकिता, जीव घावरा

---

[ * कविवर्य **भास्करराव तांबे** ]

अन् रक्ताने हृदय नाहले खड्ग डसे अंतरा
परी ना जमले काही जरा...
मग कळली कळली जादुगिरी तव पुरी
मृत्तिका अहाहा ! सुवर्ण रे तव करीं
दिव्यत्त्वा हरवी तुझी गीत-माधुरी
गेले गेले वेड मनाचे, प्रणाम हा कविवरा
एकला तुला शब्द–भास्करा...

# स्वप्नांत राहु दे जीव पुरा

स्वप्नात राहु दे जीव पुरा
रे, नको ठोठवू दार जरा !
नको वाजवू कडी दुपारी
नको बोलवू क्षण वाहेरी,
रमायाचे मजला अंधारीं,
नेत्रा न रुचे उघडा वारा...
नेत्र न मजला उघडायाचे
जग मजला ना देखायाचे
असेच डोळे मिटुनि घ्यायचे
घ्यायचे, घ्यायचे, अंधारा...
वसायचे मज इंद्रधनूवर
रमावयाचे स्वर्गंगेवर
जगावयाचे सुमगंधावर
मज नको नको तुमचा चारा...
नको जागृती, नको ज्ञान मज
विज्ञानाचे तेज नको मज
असेच उरु दे कोमल काळिज
होईल घात शिरता वारा...

# कुठे ?

कुठे सुखा, तव वास, राहसी सांग कोणत्या घरीं ?
कसा कसा मी येऊ धुंडित डोंगर अथवा दरी ? ...
काय खेळसी सांग उमलत्या नवपुष्पांच्या शिरीं
भ्रमर बनोनी येता येशिल सवे माझिया घरीं ? ...
रानपाखरासवे डोलसी काय कुठे तरुवरी ?
बनू कोकिळा, गात गात मी येऊ वेड्यापरी ? ...
काय बैससी लपुनी अथवा जलकन्येच्या उरीं
मत्स्य बनोनी गाठू तेथे तुला स्तनाग्रावरी ? ...
रूचे तुला का सांग, बसाया लपुनी मद्यान्तरीं ?
लाल जळीं त्या भेटशील का मजला कोठेतरी ? ...
गानलुब्ध तू काय गाठसी सांग, रानची परी !
गीत बनोनी येऊ उमलत भेटू ओठावरी ? ...
वास तुझा वा अथवा कोठे सुदूर क्षितिजावरी ?
हास्य उषेचे येऊ उधळित का तेथे वरिवरी ? ...
जरी राहसी मात्र चोरटा सुगंध वाऱ्यावरी
कळे न कैसे रोखावे तुज अचूक माझ्या करीं ..

## शारदे

वरा लागला नाद खुळा हा
तुला, शारदे, पूजायाचा
तव चरणावर ठेवित मस्तक
भावफुले नित वहावयाचा

जरि न लागते वेड असे हे
वेड लागले असते कसले
असेच कोठे वनीं हिंडता
मूढ पाखरू असते फसले

असाच कोठे पूर्ण दिवाणा
बसलो असतो धुंडित राने
या पुष्पावर त्या पुष्पावर
भ्रमर फिरे चाखाया सोने

वसलो असतो प्राशित अग्नी
वन्ही हृदिचा विझवायाला
दंश प्रीतीचा विसराया क्षण
नव्या नव्या जखमा हृदयाला

नाद लागता तव पूजेचा
चार फुले मी वसतो गुंफित,
जरी जमेना हार कराया
परी अहा ! सुमनांची संगत !

# अखेर आहे जळावयाचे

निर्माल्याचा शाप म्हणोनी मुग्ध कळीने फुलू नये,
गंध मुखीं वा जपू नये ?
वाण घातकी छेदिल म्हणुनी काय खगाने उडू नये,
पुष्प नभाचे खुडू नये ?
तुडुम्ब भरले सागर म्हणुनी पर्जन्याने श्रवू नये,
रानपऱ्यांना भिजवु नये ?
तुटेल कोमल तार म्हणोनी का वीणेने हलू नये
धुंद स्वरांसह रमू नये ?
सुधा न ये चाखाया कोणी म्हणुनि झऱ्याने वाहु नये
गीत वाहते गाउ नये ?
चंचल आहे सारे म्हणुनी प्रीतीमाजी बुडू नये,
सुधा विषारी प्राशु नये ?
काव्यलुब्ध ना रसिक म्हणोनी काय कवीने स्फुरू नये,
गात जगा विस्मरू नये ?
अखेर आहे जळावयाचे काय म्हणोनी हसू नये,
हसता हसता जळू नये ?

## काव्य पाहिजे ?

काय सांगतां काव्य पाहिजे ?
उचला तो रद्दीचा गठ्ठा.
भेटायाचे काय कवीला ?
मंडईतला हमाल गांठा.

काय बोचते थंडी देहा ?
नको शेगडी, या परि सत्वर
जळे निरन्तर प्राण कवीचा
शेकोटीची ऊब मनोहर.

पीठ नव्हे, ही राख अहाहा !
कविरायाच्या संसाराची
जपून जा, – त्या रक्षेमाजी
आहे थोडी कवि-स्वप्नांची

काय चमकते ते अंधारीं ?
काय काजवा, अथवा कंदिल ?
जया न भीती कधी तमाची
कण तेजाचा कविप्रतिभेतिल

## गंध आहे

गंध आहे कळीमाजी, भृंग तोवरी ना रूष्ट
गंध आहे तुझ्या मुखा, जग सदोदित तुष्ट

वृक्षराज देता छाया, पांथ तयाते आदरी
घरा माउलीची छाया, ऊब चुलीला तोवरी

वीरा मुजरा मानाचा, धार जोवरी खड्गाला,
जादू लोपता कंठीची, पुसे कोण बांसरीला ?

रस आहे फळामाजी, येई पांखरांची फौज
रस आहे शब्दामाजी, कवितेला सारी मौज

ये रे ये रे कविराया, घट मधाचा संगतीं
काय भाकरी कोरडी जिंकी रसिकाची प्रीती ?

# ठरले तू येणार

ठरले तू येणार आज ना उद्या, पूर्ण जाणे
परी ये चोरपावलाने
येशील तरी ये हळूच वायूपरी
छे ! नको ठोठवू दार वन्द ते जरी
ये असाच वाहत शान्त सुगन्धापरी
हलक्या हाती फुलासारखी उघड तावदाने
आणि ये चोरपावलाने
रे नको पाठवू निरोप कोण्या करी
छे ! नकोत पत्रे—गाठ अचानक बरी
घे गाठ चोरटी, जरी यायचे घरी
नको गुणगुणू येता येता अस्फुटही गाणे
परी ये चोरपावलाने
ये असेन जेव्हा दंग स्वप्न-रंजनीं
मावे न जेधवा मोद माझिया मनीं
वा असेन जेव्हा धुन्द गीत-गायनीं
ये साधोनी दिवस सणाचा, हासत प्रेमाने
रेशमी चोरपावलाने

मज पिचायचे ना ओंगळ शय्येवरी
रे, वरी अचानक मानेवरती सुरी
ये दौडत अथवा झंझावातापरी
ये रुद्रासम गर्जत गर्जत ये तरि वेगाने
वादळी रुष्ट पावलाने !

# वेडे पिशाच्च

वेडेविद्रे माझे मन–त्याची तऱ्हाच वेगळी
डुम्बडुम्बते सागरीं–तरी उपास निर्जळी
मुखीं सदा पाणपोई–घसा सदाचा कोरडा
पाजा अमृत स्वर्गीचे–समाधान ना बेरडा
प्याले रामायण सारे–म्हणे, 'राम त्यांत नाहीं
काय रीत ही थोरांची–टाकायाची सीता-माई ?'
ज्ञानेश्वरीची माधुरी–चाखी प्रेमे दिन-रात
म्हणे, 'कोरडी भाकर-नाही कोठे दूध-भात !'
कडू तोण्डाने चाखते तुकोबाची गोड वाणी
म्हणे, 'पाषाण-पूजनी दंग वेडा-भोळा वाणी ! '
रंगे वाय्वलाच्या संगे–कधी चार चार दिन
म्हणे 'का हो नाही जाणे ख्रिस्त थोडेसे विज्ञान ?'
फेकी कुराण रागाने म्हणे, 'पहा धर्म-गोळी
सत्तेसाठी खास कैसी कोणी अचूक योजिली !'
ऐसे पिशाच हे मूढ, वैर साऱ्या दुनियेशी
जरी खावया मिठाई, नित्य आपुले उपाशी !

## लाखाची दौलत

पिंजरा मिळे मज सोनेरी
लाखाची दौलत, गडे, घरीं

असेच कोठे वेचुनिया कण
प्राणपणाने केली बान्धण
आणि जादुची फुंकर टाकुन
बनविला, कळेना, कसा परी ?

आत ठेवला राघू चिमणा
कुणी ठेविला, विचारू कुणा ?
कसा ठेविला, ठावे कोणा ?
भेटला कोणत्या बाजारीं ?

रात्रंदिन चिवचिवतो काही
काय बोलतो कळतचि नाही
जपता जपता त्याते पाही
ना उसन्त जीवा कधी परी

नवल किती सांगावे, बाई,
पिंजऱ्यास या दारहि नाही

रीत कोठली गे वेडी ही
पाखरा जपावे कसे तरी ?

वेड तयाला नव्या फळांचे
नव्या जळांचे, नव्या मळ्यांचे
रोखा, बान्धा, ते जायाचे
आवरू, अनंता, कसे तरीं ?

# पाटलांची लेक

साखरझोपेमधीं अशी ही दौलत कोणाची ?
अरे ! हीच ना लेक थोरली पाटिलबोवांची ?

कुणी ठेविले तिला असे हे या बांधाखालीं ?
गोरा गोरा देह लपविला का गवताखालीं ?

कुणी वाहिलीं फुले तयाला चार मोगरीची ?
कुणी भरविली मुखीं, कळेना, चिमुट साखरेची ?

लालचुटुक तोंडले मिळावे कोणा चाखाया ?
लाख किड्यांची गर्दी तेथे आता चुम्बाया !

ज्या कंठाने खूष करावे गाउनि जात्याला
तिथे कुणी ठेविले विळ्याच्या जुनाट पात्याला ?

लक्ष जवाना जे वेडावी दर्शन छातीचे
काय असावे काम तिथे हो काळ्या दगडाचे ?

—कुणी सांगती, तिने दुखविले असेच कोणाला
आणि तयाने असे लपविले अपुल्या प्रीतीला !

# क्षणाक्षणाला

क्षणाक्षणाला घेसि हिरावुनि तू माझा अभिमान
हिराविशी अभिमान, परंतु सदा राखिला मान

क्षणैक स्फुरता गीत मुखांतुन ताठर होई मान
तोच पाडिसी कर्णपथावर दिव्य खगांचे गान

चार कुठे रेघोटचा ओढुनि क्षण व्हावे बेभान
पूर्व गिरीवर चित्रकलेचा करिशी खेळ महान

दो रुपयांचे गर्वभराने कोठे द्यावे दान
गगनाच्या अंगणीं उधळिसी नवरत्नांची खाण

यंत्रविशारद म्हणुनी कोठे चाखावा सन्मान
गर्व हराया तो छातीचे बोले यंत्र लहान

पोपटपंची करूनी कोठे मिरवावे विद्वान
जननाचे-मरणाचे कोडे ये पकडाया कान

हळूहळू या परी, सद्‌गुरो, करिसी विद्यादान
परी राखिशी मान – कधीही ना केला अपमान !

# आमुची तल्वारीशी गांठ

आमुची तल्वारीशी गांठ
क्षणैक चुकता धरावयाची यमसदनाची वाट,
आमुची तल्वारीशी गांठ.
पहायचे जग नेत्र मिटोनी,
वदायचे शब्दां टाळोनी,
भिजायचे ना जरी शिरावर लाल पुराची लाट,
आमुची तल्वारीशी गांठ.
पंखावाचुनि उडावयाचे
चरणाविन नित दौडायाचे
आणि विस्तवावरी पेटता हसायचे दिनरात,
आमुची तल्वारीशी गांठ.
नको नर्तनीं स्पर्श धरेला,
नको पोहता स्पर्श जळाला
आणि वायुच्या दोरीवरुनी चालायाचे ताठ,
आमुची तल्वारीशी गांठ.
जरी मुखीं मकरंद फुलांचा,
गन्ध परी ना चुम्बायाचा,

पंख मिटोनी गांठायाचा स्वर्गंगेचा कांठ
आमुची तल्वारीशी गांठ.
स्वरा टाळुनी नित गायाचे
नेत्र न मिटता झोपायाचे
अबोध जे, अन् दिसे न – त्याचे बनावयाचे भाट,
आमुची तल्वारीची गाठ.
खेळ असा हा धारेवरचा
हासत हासत जळावयाचा
रात्रंदिन या परी चालतो यमसदनाची वाट,
आमुची तल्वारीशी गाठ !

## काव्य संपता

काव्य संपता जीवनातले
मी झालो कवि, झालो मी कवि
मृत स्वप्नांचे घेऊनि मडके
वसलो घुसळित घेऊनिया रवि

दैव गतीने जरी लाभली
संगत सोनेरी दंतांची
काव्या काव्यातून गायिली
दिप्ती अनुपम कुंदकळयांची

गळचा गळचांतुनी जया विसावा
देखियल्या कॉलेज-कन्यका,
विवाह–दिनि परि खास निर्मिल्या
नितांत सुंदर मंगलाष्टका

निशिदिनि देखियला नयनांनी
खेळ गुलाबी पतिव्रतांचा
चार सुनीते रचिली झटपट
जयात गौरव पतिनिष्ठेचा

असा अहर्निश वसतो प्राशित
मदिररम्य कवितांचे प्याले
लेखणीतुनी काव्य जन्मले
काव्य संपता जीवनातले

□ □ □ माधव का. देशपांडे

## मज कळेना

मज कळेना कैसे ते–पिसे जडे हे काव्याचे
शब्द घेऊनिया संगे–नित्य हार गुंफायाचे
सारे शब्दमय जिणे–शब्द धन, शब्द अन्न
रुचे उपाशी घोटाला–तेच एकले पक्वान्न

कळे मूढपणा सारा–परी वळतची नाही
सारे हासती, टोचती–वेड हटतची नाही
"नको, नको, नको काव्य–रचा कथा-कादंबऱ्या"
रात्रंदिन येती कानीं–संपादकीय ललकाऱ्या

गोड गोड धूळ खाती–जाडे कवितांचे भारे
नेती मिरवित त्याते–रद्दीवाल्यांचे खटारे
नाही संपादिले ज्ञान–मेळविले नाही धन
जन्मभरी ऐसा आलो–संगे घेऊन अज्ञान

रुष्ट होऊन अर्धांगी–वदे, "द्या माझ्या हातात
काव्य गोंडस सुंदर–सारे कोंवते चुलीत"
कधी बोलावे गर्वाने–"मीच कुबेराचा बाप"
बोले मित्रवाणी–"देखा, हातभट्टीचा प्रताप!"

नाही मान आजी काव्या—सारे कळे हो मूढाते
" पुरे झाला मूढपणा "—कैसे सांगू या आत्म्याते ?
कैसे कळावे कोणाला—नाही कोणा कळायाचे
जेव्हा कळे नुरे तेव्हा—गूढ सारे हे विश्वाचे !

## कुबेर

पगार होता अवघा शंभर, आणि पोरटी सहा
चार पाहुणे नित्य छळाया, नंतर होई दहा...
रेटरेटता असा खटारा, झडला होता पुरा
'दामू मास्तर', वय पंचावन, सदैव अग्नी उरां...

"पुरे हमाली", म्हणे, "पाजतो ज्ञान मुलांना शिळे
हे उष्टे खरकटे वाढता प्राण जाहले लुळे...
उनाड ही कारटी तयांना ना ज्ञानाची तृषा
या धोंड्यांच्या मुळे अरेरे ! आयुष्याची दशा...

बरोबरीचे मित्र मिरविती श्रीमंतीचा तुरा
परि माझ्या नादान अंतरीं दारिद्र्याचा सुरा...
टाका, टाका, टाका चिरडुनि त्वरें गटारी किडा,
जातो काही पिऊनी – नंतर हासा अथवा रडा"...

× × × ×

सुटता शाळा येती मास्तर खोकत खोकत घरीं,
भयाण वादळ गर्जत होते पिचलेल्या अंतरीं...
असेच अपुले होते बसुनी अंधारीं एकटे,
तोच "पाहुणे आले" येई सांगाया पोरटे...

राग गिळोनी तसेच उठती चित्त न भानावरी,
आणि दचकले समोर दिसता दोन निळ्या मोटरी...
साहेबी थाटात उतरूनी येई कोणीतरी
होते संगे चित्र मनोहर–जणू रानची परी...
" ओळखिले का मला ?" विचारी साहेबी वैखरी
" उनाड ' रामू ' – छड्या तयाच्या शंभर हातावरी...
आठवते मज गदा आपुली – तिनेच गेले पिसे
नातरि होते आयुष्याचे सारे सारे हसे...

" थोर आपुली कृपा ! – वाचलो केवळ अपुल्यामुळे
गुरुजी, चरणावरी वाहतो ही अश्रूंची फुले.."
नावरता आसवे गर्जले पंत – मुखावर हसे
" कुबेर मी हो ! कुबेर मी हो ! .. भाग्य कुणाचे असे ?"

## झाड एकले

दो रस्त्यांचा कोन साधुनी
समोर गिरणी, दोन गटारे
बैकारांची पीत आसवे
झाड एकले उभे बिचारे

ऐकत यंत्रांच्या तक्रारी
बैसे मोजित ट्रॅम-मोटरी
खोकत खोकत सदैव चाखी
गिरणीची धुरकट ओकारी

झडले पल्लव, सडल्या फांद्या
घाण विषारी शोषशोषिता,
कर्करोग त्या जाई जाळित
शहरी अमृत चाखचाखता

उदास पिवळी पिवळी पाने
ना चिमण्यांची गर्दी कोठे,
चार कावळे मात्र उपाशी
रात्रंदिन आक्रन्दति बेटे

अता न येई खार लपाया
लाल जिभेची जादू दावित
अता घावरट ससा न येई
कान लांवरे अहा ! उभारित

कधी रोडके पोर दिसावे
उगाच अपुली चाटित बोटे
कधी कधी ये भेट द्यावया
हळूच फिल्मी प्रेम चोरटे

दूर राहिली हिरवी राई
झुरे म्हणोनी नित्य अंतरीं
स्वप्नामाजी ये खिजवाया
हिरवा डोंगर, मोकळी दरी

अता न ये भेटाया मैना
वा साळुंकी क्षण सुखवाया
कधी न ये चंडोल पाहुणा
फूलपाखरु वा विलगाया

सगे तयावे दूर कुठेतरि
चाखिति पाणी थंड झऱ्यांचे
चुंबिति वायू पल्लव त्यांचे
ऐकत ऐकत गान खगांचे

पुष्ट मखमली देह तयांचे
कधी न बाधा वार्धक्याची
स्वच्छ नदीचे सुंदर पाणी
सांभाळी कांती तेजाची

हिरव्या हिरव्या राईमाजी
चुंबन संतत तया पऱ्यांचे
येई घेउनि वायू अत्तर
मिळे लुटाया हास्य फुलांचे

हे परि अपुले खिन्न एकले
दमेकरी पारवा संगती
मधेच स्फुंदे चुबड अजारी
उनाड झुरळे चाव-चावती

सरली सरली हिरवी नाती
सरली छाया, सरली माया
धूळ चाखिता, धूर भक्षिता,
जीवत–रस आला संपाया.

# यात्रिका

यात्रिका, कुठे निघाला असा
दिसे पताका जुनाट हातीं, आणि रिकामा खिसा
यात्रिका, कुठे निघाला असा ?
जरि मलीन वस्त्रे, रूप नसे वेंधळे,
हे भ्रमण वाटते खास जगावेगळे,
नेत्रात खेळते दिव्य तेज आगळे
सुदूर क्षितीजाकडे खेचिते, सांग, कशाची नशा
यात्रिका, कुठे निघाला असा ?
घेशी न विसावा क्षणहि कसा तरुतळीं,
बुडविसी कसा ना पायहि शीतल जळीं
रे फुलाफुलांचे वेड कसे ना मुळी
सगे सोयरे ना सांगती, गमसी वेडापिसा
यात्रिका, कुठे निघाला असा ?
जरि गाती मंजुळ लक्ष रानपाखरे
स्वागता डोलती रम्य फुलांचे तुरे
निरखिती तुला ती कशी गाइ वासरे
नजर वळेना परी--अंतरीं सांग कशाचा ठसा,
यात्रिका, कुठे निघाला असा ?

जरि बुडली बुडली दुनिया सारी तमीं
परि भ्रमण तुझे हे कसे न होई कमी
कोणते अंतरा हरी स्वप्न रेशमी,

अंधारातुन, वनावनातुन नित्य हिंडसी कसा
यात्रिका, कुठे निघाला असा ?

का गूढ आर्तता नेत्रीं खेळे अशी ?
ती मान ताठ का, शब्द का न बोलसी ?
का क्षितीजावरचा पुष्पगंध इच्छिशी ?

पुढे पुढे तुज अशी चालवी का पूर्वेची दिशा
यात्रिका कुठे निघाला असा ?

तू कोण कोठचा, आणि निघाला कधी ?
दिव्यता कोणती, सांग अंतरा वधी ?
वाहिलेस अपुले हृदय कोणत्या पदीं ?

काय हरपले, काय निसटले, काय सले मानसा
यात्रिका, कुठे निघाला असा ?

तो म्हणे, " सज्जना, ऐक आमुची कथा
हे भ्रमण नव्हे वा, ही आत्म्याची व्यथा
ना अंत, तसा प्रारंभ आमुच्या पथा,
अखंड अमुचे भ्रमण, अहर्निश दिव्यत्वाचा वसा
कळे का कुठे निघालो अम्ह ?

## जरि भृंग

क्षण ऐक, सखी, या मम वचना
जरि भृंग, टाळितो का सुमना ?
भय न मला, सखि, लोकमताचे
वेड न जडले उगा नीतिचे
सोंग न जमले मांगल्याचे
टाळितो परी कुसुमोद्याना...

गूढ जाणतो मम रक्ताचे
रक्त नव्हे चंचल भ्रमराचे
वेड तया कोमल निष्ठेचे
वाटते म्हणोनी भयचि मना...

कुठे स्पर्शिता क्षणैक काया
जडेल वाटे अवचित माया,
निष्ठा मग उपजे चिडवाया,
मग स्वास्थ कोठचे वरे मना ? ...

जळावयाचे मग रात्रंदिन
झरति आसवे नित नेत्रातून

सरे जागृती, उरे स्वप्न पण
सामर्थ्य न इतुके या दाना
टाळटाळितो तरि या खेळा,
फळे गोमटी या न लतेला,
मुखीं मात्र दुःखाचा प्याला
कळले ना, सखि, का असा गुन्हा ?
जरि भृंग टाळितो का सुमना ?

## काव्य खुळी

मी काव्य खुळी, मी काव्य खुळी
शब्दाविण मज करमे न मुळी

दागदागिने नकोत बाई
माणिकमोती–आस न काही
नको हिऱ्यांची कर्ण - फुलेही
नवशब्दांचे घुंगुर बांधुन वसेन नाचत खुळी
मी शब्द खुळी, मी काव्य खुळी.

नको खेळणी, नको मैत्रिणी
सगे सोयरे–जुनाट नाणी
नकोहि नवरा–कोमट पाणी
रुचे मला शब्दांचे नाते–पडेन त्यांच्या गळीं
मी शब्द खुळी, मी काव्य खुळी.

नकोत गजरे–उचला भारे
नकोही वेण्या–गेन्द हासरे
चार क्षणांचे धन हे सारे
शब्द सुमांची वसेन चुम्बित एक एक पाकळी
मी शब्द–खुळी, मी काव्य खुळी.

□ □ □ माधव का. देशपांडे

नको पैठणी, गर्भरेशमी
वा जरतारी कपडे नामी
प्रसाधने नच येती कामी
शब्द पाठवा परि झांकाया ही काया सावळी
मी शब्द खुळी मी काव्य खुळी

शब्द सुगंधी, शब्द हासरे
शब्द बोलके, तसे नाचरे
कळे जयाते सारे सारे
रमेन त्यांच्या सवे–रुचे मन ही दुनिया वेगळी
मी शब्द खुळी, मी काव्य खुळी !

## चालले प्रेत

चालले प्रेत पुढे हळुहळू
कुणी धाय मोकला, रडा वा कुणी अता मुळुमुळू
चालले प्रेत पुढे हळुहळू

ती कळता वार्ता येती सज्जन घरीं
कविराज त्वरेने चढले ताटीवरी
नाकात तुळस, अन् गुलाल छातीवरी
आणि निघाले, मडके धुरकट, ते स्फुंदत हळुहळू
चालले प्रेत पुढे हळुहळू

पुसले न कुणी त्या जगीं असे जेधवा
आले ना पुसाया कुणी कधी आंसवा,
बोलले न कोणी गोड शब्द केधवा,
परी लोपता ज्योत, अचानक प्रेम लाभले गळू
चालले प्रेत पुढे हळुहळू

तो शब्द खुळा, त्या वेड मात्र एकले,
एकटा बसोनी काव्य रची आपुले,
ना रसिक म्हणोनी संतत हृदयीं जळे

आज पोचवावया कवींचे सैन्य लागले झुलू
चालले प्रेत पुढे हळुहळू

लाभली तया ना गार सावली कदा
टोचले टोचले सदैव कंटक पदा
ना दिले तयाते फूल कुणी एकदा
आज अहाहा ! देहावरती बाग लागली फुलू
चालले प्रेत पुढे हळुहळू

पोचता स्मशानीं शोक न मावे उरीं
आसवात भिजली सहस्त्र हृदये पुरी,
कविराज झोपती ऐटित सरणावरी,
आणि अहाहा ! झणी लागले लाल निखारे फुलू
लागले प्रेत लागले जळू

# जादूगार तू

लाविलेस का वद, करुणाधन,
प्रीतीचे हे वेड जगाला,
का पुष्पांच्या उधळित राशी
कपटाने परि सर्प लपविला ? ...

दंश विखारी होता सरली
सरली सारी सारी अक्कल,
प्राण न जाता मरावयाचे
जगण्याची मग अवघी नक्कल...

सरे मोद, ये पूर आंसवा,
आणि बने निर्माल्य फुलांचे
लोपलोपता गायन सारे
मात्र उरे रोदन वीणेचे...

अता वनीच्या सरल्या क्रीडा,
अता मृगाला एकच चाळा,
शोधित निर्झर धावायाचे,
अंतरिच्या विझवाया ज्वाळा...

लहर क्षणाची तुझी, अनंता,
परी भंगले जीवन सारे
वसावयाचे आता चुंबित,
काळजातले लाल निखारे...

क्रूर कसाई असा वनोनी का
खड्गाने उगा छेदिले ?
का पेटविली उगाच राने
उगाच का प्रभु, असे शापिले ? ...

मूढ परी मी, कळे अखेरी
जादूगार तू थोर, अनंता,
ना तरि होत्या सीता साऱ्या
या परिसाविण वारयोषिता...

# असाच आलो वाहत वाहत

असाच आलो वाहत वाहत,
जन्मापासुनि तोडित पाणी,
कुणी फेकिले नदीत केव्हां,
आणि कशाला ? – न कळे कोणी...

शेवाळातुनि अन् गाळातुनि
मार्ग काढिता प्राण घाबरा,
वार टाळिता नित खडकांचा,
होई कावरा, होई बावरा...

कधी आपटी, मार मुका कधि,
या वळणावर, त्या वळणावर,
कधी पुराचा लाल तडाखा,
अचूक बैसे भग्न उरावर...

दो काठांना सुंदर वेली,
बोलविती वेळावित माना,
जीव चालला वाहत वाहत,
क्षणैक दावित हास्य तयांना...

कधी धरावे क्षण फांदीला
गुरगुरते रागाने पाणी,
अन तोंडावर देत तडाखा,
पुढे पुढे नेई हिसकोनी...

असा चालला जन्मापासुनि,
प्रवाहातला प्रवास सारा,
गांठणारा हा जीव, अनंता,
कधी किनारा, कधी किनारा ? ...

# सुगंधा

कशास लपसी सांग, सुगंधा, नित सुमनांच्या उरीं
कोण ठेविते तिथे रोखुनी, तुला आपुल्या करीं ?
काय राहते तिथे मनोहर हंसरी नाजुक परी
लुब्ध होउनी तरी सदोदित त्या रमशी पंजरीं ?
नवल गमे मज सदा राबसी असा गुलामापरी
उगाच का उधळिशी संपदा उजाड माळावरी ?
पुरी दिवाणी कलिका भुलली उनाड भ्रमरावरी
रंजवावया त्या मूढाला का श्रमसी वरिवरी ?
तरी प्रार्थितो तुला, सुंदरा, ये ये माझ्या घरी
पहाट होता वायू संगे डोलत दारावरी
ये उधडोनी दार, चढोनी तसाच भिंतीवरी
नको वाजवू पाय, हळुहळू ये माझ्या अंतरीं
गंधित होता प्रतिभा, अवचित बनेल ती स्कतुरी
गीतागीतांतून वाहतिल माधुर्याच्या सरी
त्या गीतांचा गंध पसरता चंचल वायूवरी
आनंदाच्या लक्ष तारका हसतिल अवनीवरी
ये तरी ये, उजळाया ज्योती माझ्या गीतांतरीं
नको घालवू वाया दौलत नवसुमनांच्या उरीं

# नेत्र असे

नेत्र असे मज देइ, अनंता,
दिसे जया जे दिसे न कोणा,
अमूर्ततेला, अस्फुटतेला
जया दिसे फुटलेला पान्हा

दे नयना ज्या स्वच्छ दिसावी
गुप्त वेदना अंतरातली
मृत्तिकेतली सुवर्ण रेखा
आणि दिव्यता आंसवांतली

नेत्र नको मज जया दिसेना
गणिकेच्या हृदयातिल ईश्वर
नश्वरतेतिल अमरत्वाचे
जया घडेना दर्शन सत्वर...

नेत्र हवे मज, दिसे जयांना
गाढ तमी लपलेला भास्कर
वास तृणांचा, गंध फुलांचा
अश्रद्धांचा नव परमेश्वर

## जरी यायचे ये तरि कोमल

जरी यायचे ये तरि कोमल हास्य-फुले घेऊन,
राजसे, हास्य–फुले घेऊन,
चंचलतेच्या पंखावरती जाई सर्व उडून
राजसे, जाई सर्व उडून.
नव कलिका शोभे सौंदर्याची परी
गे, मृदुल मनोहर गंधवती हांसरी
उमलता भृंग हावरा झगडतो उरीं
आणि कोवळे प्रेत डोकवी हिरव्या पानांतून
राजसे, हिरव्या पानांतून
रंम्यत्वाचा असा चालला क्षणाक्षणाला खून
राजसे, रानारानांतून.
का यौवनपुष्पा निर्माल्याची सजा ?
का दवबिंदूंना क्षणाक्षणाला इजा ?
का प्रेमभावना अवचित घेई रजा ?
आणि उमलता गीत जिभेवर वारा टाकि पिऊन
राजसे, वारा टाकि पिऊन
दिव्यत्वाचा अर्थ नुमगता असा चालला खून
राजसे, क्षणाक्षणाला खून.

गे, कुणी ओतिला गंध फुलांच्या उरीं
शिकविली खगांना कुणी गान-माधुरी
का वृक्षलतांना लाभली न वैखरी ?
वेदही थकले देता उत्तर घेती तोंड मिटून
राजसे, घेती तोंड मिटून

गे, कुणी फेकिला कंदुक वाऱ्यावरी ?
लाभली तयाते गती कोणत्या करीं ?
का रूसे मृत्तिका दीप विझाल्यावरी ?
सोडविता हे गणित आगळे बसले ज्ञान रूसून
राजसे बसले ज्ञान रूसून

तरि उघळ चांदणे नव नेत्रांतिल गडे
अंगणीं पडू दे नव मोत्यांचे सडे
तारील निराशावाद कुणाला गडे ?
ये तरि ये ये नव झुळझुळते गीत मुखीं घेऊन,
राजसे, गीत मुखीं घेऊन
चार क्षणाचा खेळ मात्र हा, जाई सर्व उडून
राजसे, जाई सर्व उडून

## कळले मज आज

निशिदिनि मज येइ याद तुझी याद आई
कळते मज आज, कसे ना कळले काही
रूग्ण आज शय्येवर, एकला असा मी
रूसले हे चरण कसे, जाहलो निकामी
घरटे हे सोडुनिया पाखरे पळाली,
किलबिलत्या पंखांची आणि सरे केली
हास्य पळे, तेज नुरे, सले मात्र धूर,
रूसलेल्या वीणेची आणि तुटे तार
देती नवनेत्र आज यातना जिवाच्या
कळती मज आज व्यथा तुझ्या अंतरीच्या
कळते मज चूक आज प्रिय माझे आई
शरपंजरिं तू असता लक्ष दिले नाही
चुरिले ना चरण तुझे, प्रेममूढ होता
हिंडविले ना तुजला धरूनि तुझ्या हाता
त्रासुनिया, चार फळे ठेविली उशाशी
कळले ना हृदय कसे तुझे नित उपाशी
आणि कधी देता तव मुखीं दोन घास

कळले ना मायेचा तुला नित उपास
वृद्धत्वी निज शिशुपण रुप घे निराळे
बाळाहुनि बाळ बने हृदय भुकेलेले
वाटे कुणि मृदुल स्पर्श शिरी खेळवावा
बाळाने मातेला बाळपणा द्यावा
घेतले न अंकावर बाळापरि आओ
अंगाओ गात गात जोजविले नाही
शल्ये तव अंतरिची ना कळली काही
पुत्रधर्म विस्मरुनी जाहलो कसाई
आठवता आज परी तुझी करुण मूर्ती
नेत्रातून का वेडी आसवे वहाती ?

## जगु दे मज

जगु दे मज, मज जगु दे, जीवन मज जे रुचते
आजवरी ना कळली, चूक अतां परि कळते.
तोषविण्या छात्रगणा,
आवरिले मूढ मना
आदरिले नित्य जना,
आज कळे व्यर्थ व्यर्थ– मृगजळ सारे नुसते
जगू दे मज, जगु दे मज, जीवन मज जे रुचते.
धिक्कारित सर्व जगा
रमली जी मम संगा
दिघला मी तिजचि दगा
जननिन्दा टाळाया राखियले हृदय रिते
जगू दे मज, जगु दे मज, जीवन मज जे रुचते.
चूक पुरी आज कळे
अनुतापे हृदय जळे
आज गमे मुक्ति मुळे
आज सरे मृत्यु अतां नव जीवन हृदिं स्फुरते
जगु दे मज, जगु दे मज, जीवन मज जे रुचते.

तुटले मम बंध आज,
मावळली सर्व लाज,
ये राणी, करूनि साज
होउनिया धुंद, गडे, चल हांसू मरणाते
जगु दे मज, जगु दे मज, जीवन मज जे रुचते,
आजवरी ना कळली, चूक अतां
परि कळते.

# रात्र ही

रात्र ही अशी–अशीच सतत राहु दे
हृदयातुनिही असेच रुधिर वाहु दे
शुक्राचा नभि तारा
खिजवी मज हसुनि जरां
फुलवि अग्नि मात्र उरा
अंधारीं धुकासम मजसि कण्हू दे
रात्र ही अशी–अशीच सतत राहु दे.
दूर कुठे गीत स्फुरे
त्यातुनि आनंद सरे
छेदी परि हृदय पुरे
रातकिडे आक्रंदति –त्यात रमू दे
रात्र ही अशी–अशीच सतत राहु दे.
न रुचे मज अरुणोदय,
न दिसो रविराज सदय,
तेजाचे वाटे भय
गाढ गाढ अंधारीं प्राण झुरू दे
रात्र ही अशी–अशीच सतत राहू दे.

□ □ □

माधव का. देशपांडे

अ. क्र.

उघडु नका मुळि दारे
मारुनी टाका वारे
जा सोडुनि घर सारे
एकलेच एकलेच, मजसि जळू दे
रात्र ही अशी–अशीच सतत राहु दे.
हृदयातुनीही असेच रुधिर वाहू दे.

# कां ?

पुसति सख्या नित्य मला, कवयित्री मी चतुरा
नम्र कशी तव चरणीं, ज्या न रुचे काव्य जरा ?

समजावी त्यास कशी, अद्‍भुत मम प्रेम-कथा
अुमगावे आणि कसे का रमले प्रेम-पथा

काव्यलुब्ध तू न कधी, रमशी गद्यांत सदा
परि वाटे मात्र तुझ्या स्पर्शावे नित्य पदा

देखियले वहुत कवी, काव्य मुखीं ज्या खेळे
देखुनि जीवन त्यांचे, भ्रम माझा दूर पळे

प्रीतीच्या दिव्य कथा, हर्षभरे नित रचिती
नवशिकार साधाया भृंगासम जगिं भ्रमती

काव्यान्तरि प्रभु-गायन, हृदयान्तरि पाप दड
गृहगीते गाति मधुर, संसारीं पत्नि रडे

क्रांतीच्या स्फूर्तिकथा आरडती ओरडती
कर्दमिचे जंतु परी, कर्दमीच नित रमती

न्यारे परि तव सारे, रचिसी ना जरि गीते
काव्यमधुर तव जीवन हर्षविते लोभविते

प्रियदर्शन तू रमणा, मोहक जणु काव्य हसे
सत्यव्रत तू, आत्मा काव्याचा जणु गवसे
निर्मळ नित तव वाणी, काव्यासम शुभ गमसी
सुंदर, शिव, सत्य असे जीवन संतत जगसी
मूर्तिमंत काव्यचि तू, जरि न स्फुरे गीत गिरा
नम्र म्हणुनी तव चरणीं, कवयित्री ही चतुरा

## ईश्वरा,

ईश्वरा, पुरे अता तव दान,
दिलेस वेडे हृदय घेइ जे क्षणोक्षणी मम प्राण
ईश्वरा, पुरे अतां तव दान.

पाजिली जयाते प्रेम-सुधा या करीं
बैसलो घेऊनी प्रेमभरे या उरीं
आसवे जयांची साठविलीं अंतरीं
तया न कळती अश्रू माझे, ना उमजे वलिदान,
ईश्वरा, पुरे अता तव दान.

राखिले जयाते होउनिया माऊली,
बाधली न ज्याते तिरिप उन्हाची मुळी,
ज्यावरी पसरली गार गार सावली,
कळे न त्याते कसा उन्हाळा घेई माझा प्राण
ईश्वरा, पुरे अता तव दान.

दिनरात राहिलो दंग नित्य लेखनीं,
राहिलो एकटा, मोह लक्ष टाळुनी,
बाळांची चिंता नित्य राखिली मनीं,
टाळटाळिल्या पुष्पवाटिका, होउनिया पाषाण,
ईश्वरा, पुरे अता तव दान

मायेच्या पोटीं बनलो दुबळा पुरा,
घेतल्या लावुनि लक्ष कळा या उरां,
नित कापकापतो हा सोन्याचा सुरा,
मायेचा हा खेळ पुरे हा, बनव अता सैतान
ईश्वरा, पुरे अता तव दान.

वाटले एकदिन मिळेल मज सावली,
वाटले, बालके होतिल मम माउली
यापरी बैसलो चुंबित आशा खुळी
असा घेतला उगा मारुनी मीच काळजा बाण

ईश्वरा, पुरे अता तव दान.
भागलो फुलविता हा अश्रूंचा मळा,
रे विटलो आता, रे विटलो मृगजळा,
सहती न अंतरा घोर चावऱ्या कळा
पाज विषाचा घोट आणि घे या ज्योतीचा प्राण
ईश्वरा, पुरे अता तव दान.

रे, टाक तोडुनि ही वेडी आतडी
ही नको वंधने, बरी विषाची पुडी
रे शिकव अंतरा रीत अता वाकडी
टाक छेडूनि काळिज आणिक बनव पुरा नादान
ईश्वरा, पुरे अता तव दान
दिलेस वेडे हृदय घेइ जे क्षणोक्षणी मम प्राण
ईश्वरा, पुरे अता तव दान.

# येशी भर वादळांत

गाढ गाढ अंधारीं
येशी भर वादळांत, येशी भर पावसात

नव्हते नेत्रांत पाप
विषयाचा गुप्त माप
निर्मळ ते रुप तुझे दरवळले अंतरांत
येशी भर वादळांत, येशी भर पावसात.

बोललीस क्षण काही
कळले परि मज नाही
अश्रूबिंदु एक परी सांगे जे जे मनांत
येशी भर वादळांत, येशी भर पावसात.

गहिवरलो मीहि पुरा
आलो अन् जवळ जरा
अश्रुबिंदु तो पुसुनी दिधला हातात हात
येशी भर वादळांत, येशी भर पावसात.

नव्हता तो हात परी
आत्मा दिधलाचि करीं

दान तुझ्या आत्म्याचे टाकियले तूहि त्यात
येशी भर वादळांत, येशी भर पावसात·

रमलो किति दूर वनीं
जपिला परि गंध मनी
आत्म्यांच्या कथित व्यथा भिजलो नित आसवांत
येशी भर वादळांत, येशी भर पावसात

गंगेचे मंगल जळ
स्नेह आपुलाचि नितळ
दश वर्षे आज तया तीच शात शांत ज्योत
येशी भर वादळांत, येशी भर पावसांत

भुंक दे जग काही
चिंता मज कण नाही
भय कसले कोणाचे ? जरि न पाप अंतरांत
जरि न पाप अंतरात
गाढ गाढ अंधारीं
येशी भर वादळांत, येशी भर पावसात.

□ □ □ माधव का. देशपांडे

# ही हिरवी – पिवळी शेते

ही हिरवीं – पिवळी शेते
घ्या वेचुनि माणिक – मोत्ये

ही जमीन काळी काळी
पांघरा शाल मख्माली

मोटेचे पाणीं गार
ताटात तुपाचीं धार

भुइमूग काढला, खा जी !
रे, साय दुधाची ताजी

ही गाभुळलेली चिंच
घ्या, घ्याच खवा वाइच

ही खिल्लारे हुंबरती
घ्या मोजुनि रुपये सुर्ती

अन् समोर माझी राणी
अंब्याच्या वर्फीवाणी

# या अशाच कातरवेळी

या अशाच कातर वेळी – भेटलो अचानक येथे
आठवते मजला सारे – जे नवल इथे घडले ते...
होतास उभा सामोरी – हातात तृणाचे पाते,
आलास निकट ना केव्हा – एकटी जरी मी होते ! ...
प्राशिती तुझ्या रुपाला – मम कोमल सुंदर नेत्र
शांतता तुझ्या नजरेची – ढळली न परी अणुमात्र...
गांभीर्य सागरावाणी – मी वेडी मोहित झाले
निर्विकारतेने तुझिया – मी पूर्ण जिंकिले गेले...
वाटले पहावे माते – तू जरा नव्या नजरेने
नेत्रात पुरे थिजवावे – तापल्या तुझ्या रक्ताने...
वाटले येऊनी जवळी – ओठांस ओठ भिडवावे
तव कठोर स्पर्शामाजीं – या गद्य जगा विसरावे...
वाटले तुझ्या ओठांना – सांगावे काही काही
सांगावेही नेत्रांना – परि धीर जाहला नाही..
कुस्करावया कलिकेला – बेभान क्षणैक बनावे
विसरुन जगाते साऱ्या – बाहूंत मला चिरडावे...
गावीं न तुझ्या परि काही – हिम-खंड पुरा तू गमला
वादळे मनाची माझ्या – रे, कशी न कळली तुजला ?

# किड्यांचे गाणे

पहा आमुच्याकडे, थांबुनी पहा आमुच्याकडे
पहा जरा, नृपवरा, आमुचे वैभव ते केवढे ?

मृगयेसाठी धुंडधुंडिसी उंच गिरींचे कडे
मिळे कधी आयते भोजना का झुरळाचे मढे ? ...

रंजन करण्या तुझे कवींचे सैन्य ठाकले खडे
झडती का स्वागता परंतु चिलटांचे चौघडे ? ...

मधुर फळे चाखिसी, प्यावया सज्ज सुधेचे धडे
चाखिलेस का परी फाकडें कुजलेले कोंबडे ? ...

दूरदूरची वंदन करण्या नररत्ने तुजकडे
आले का भेटाया गांडुळ प्रेमभरे नागडे ? ...

नृत्यविलासा तव प्रासादीं महाल सजती बडे
मिळे कधी नर्तना परी का, वद तरते खेकडे ? ...

सुवर्ण मंचक सुखशय्येला, कळे अम्हां, तुजकडे
उब परी देई का केव्हा श्वानाचे आंतडे ? ...

सांग कसे मज पुसेल तुजला कोण आमुच्यापुढे
मौज हवी तर ये, कंगाला, त्वरें आमुच्याकडे ...

# आठवतो काल खुळा....!

आठवतो काल खुळा, प्रेम-मूढतेचा,
रात्रंदिन झुरत झुरत, प्राण द्यावयाचा !
ऐकुनिया तव वाणी
भरले या वेड मनीं
नत झालो तव चरणीं
अंतरात आज सले, गंध त्या वचांचा,
आठवतो काल खुळा, प्रेम-मूढतेचा...
कुसुम-मृदुल नेत्र तुझे
धुंदविती मन माझे
वेड हृदीं एक तुझे
आज रूचे ना कटाक्ष जादुगारिणीचा
आठवतो काल खुळा, प्रेम-मूढतेचा...
साठविलीं तव गीते,
अंतरात, आठवते
आज परी हृदय रिते,
ध्यास नुरे आज मुळी गान-माधुरीचा
आठवतो काल खुळा, प्रेम-मूढतेचा...

□ □ □ माधव का. देशपांडे

न कळे हे होइ कसे
का सरले सकल पिसे
का न हृदय आज हसे
ना उरला, हाय ! आज मोहही स्मृतींचा,
आठवतो काल खुळा, प्रेम-मूढतेचा...

# तो क्षण

असाच येतो कधी न फसता
दात आपुले उगाच विचकित
पिसाट तो क्षण ! – पुरा कसाई
बुजलेल्या जखमांना डिवचित...

मृत आशांची फौज निघे मग
खिदळत खिदळत छेदी अंतर,
आणि बैसता घाव जिव्हारी
गीत सोडिते प्राण जिभेवर...

कोसळता रक्ताच्या धारा,
त्यात नाहते हृदय कोरडे
शोध शोधिते श्वान मनाचे
पिंचलेल्या स्वप्नांची हाडे,

चघळित ती कुजलेली दौलत
क्षीण स्वराने स्फुंदत स्फुंदत
फिरे भोवती श्वान दिवाणे
द्वाड क्षणावर भुंकत भुंकत...

# काळ्या काळ्या नभी

काळ्या, काळ्या नभीं
काजळी काळचा, काळचा नभी,
पहाट झाली तरी आपुली एक चांदणी उभी
तिज जीभ दाखवी वीज हंसोनी खुळी,
आलिंगन घाया उत्सुक मेघावली
तडफडे नाचरा वायु पडाया गळीं
परी फुलेना हृदय, गमे ती धुंद स्वप्न–सौरभी
आपुली एक चांदणी उभी.
कां खिन्न राजसे, काय जाहले बरे ?
नेत्रातुन संतत नीर कासया झरे ?
गे कुठे पळाले तुझे नेत्र हासरे ?
पहाट झाली तरी कशाला अशी एकली उभी,
आंधळचा काळचा काळचा नभी ?
परि जवाब नाही–नेत्र मात्र बावरे,
नेत्रांतुन अपुले नीर अहर्निश झरे,
वादळी मेघ स्पर्शिता ओठ थरथरे
ये भिववाया वादळवारा, वदे गीत रासभी,
चांदणी एक आपुली उभी.

तो वदला काही सागर अवनीवरी
वच परिसाया ती मान वाकडी करी,
दर्पणी दिसे निज अद्‌भुत काहीतरी,
आणि घेतली उडी, धावली खाली खाली खुळी !
चांदणी शोधा आता जळीं.

मराठी ग्रंथ [illegible], ठाणे. [illegible]
[illegible] ........................ दि: ........
[illegible] ........................ [illegible]

## मी वेडी

मी वेडी—क्षण मला वाटले

शशिकिरणांवर स्वार होउनी
पहाटचा क्षण अचुक साधुनी
केवळ माझे वेड म्हणोनी,
येशिल स्वप्नीं मज रमवाया,
मज सुखवाया.

होउनि अथवा मंद समीरण,
नकळत नवकलिकेते चुम्बुन,
तिच्या मुखीचे अत्तर चोरून
हृदय सुगंधित हे बनवाया
मज खुलवाया.

होउनि अथवा गीत मनोहर
तव प्रीतीचे उधळित केशर
येशिल शोधित रे माझे घर,
हृदय कोरडे हे फुलवाया
ते झुलवाया.

हाय ! परंतू स्वप्नचि सारे
आले गर्जत वादळ-वारे
आणि मोडती खिडक्या-दारे,
अता पिशाचे मज खिजवाया.
मज रडवाया.

## मराठी बाणा

पोलादाचा सुरा
मराठी बाणा ताठर पुरा
जरि नसे मराठा कुबेर कोणी सुखी,
जरि कांदाभाकर हीच मिठाई मुखीं
ना झेलायाचा कधी कुणाची थुकी
मात्र मनांतुन स्वच्छ वाहतो सह्याद्रीचा झरा,
मराठी बाणा ताठर पुरा.

जरि कधी न मुजरा उगा कुणा ठोकला
परि संतपदावर नित माथा ठेविला
घेउनी तयांते शिरीं नाच नाचला
वाघ रानचा, परी सज्जनांपुढे जोडितो करां,
मराठी बाणा ताठर पुरा.

जरि कळे न त्याते प्रेम वदावे कसे
जरि जमे कधी ना कधी नाटकी हसे
ते रक्त खरे ! – त्या अस्सलतेचे पिसे
देशासाठीं उघडी छातीं – मर्द खडा संगरा
मराठी बाणा ताठर पुरा.

जरि रमे न त्याच्या घरीं सृष्टिसुंदरी
जरि हिमालयासम भव्य भव्य ना गिरी
जान्हवी परी वाहते खोल अंतरीं
जरी पाहिजे सुधा, भाकरी या चाखाया घरां
मराठी वाणा ताठर पुरा.

जिकाल तरी या प्रेम घेउनी उरीं
जाणतो मराठा प्रेमाची चाकरी
घेईल भावडा लोटांगण भूवरी,
मात्र डिवचता—अचूक तुमच्या दंश विषारी करां;
मराठी वाणा ताठर पुरा.

# शारदे, अखेरची ही गाठ

शारदे, अखेरची ही गाठ,
जिला टाळिले तिच्या गावची ठरली आता वाट
दनरात श्रमोनी प्राण तुला वाहिले,
ठेविले पदावर जे हृदयीं राखिले
अर्पिली भक्तिने मम आत्म्याची दले
परी पामरावरी न वळली तुझ्या कृपेची लाट
कधी ना तुझ्या कृपेची लाट.

मन्दिरीं तुझ्या नित भक्तांचा सोहळा,
गे, अखण्ड पिकला सत्काव्याचा मळा,
ज्ञानेश अर्पिती सुन्दर माळा गळां,
नवरत्नांचे हार वहाया कुबेर सज्ज उन्हात
शारदे, कुबेर नित्य उन्हात.

अर्पिती कुणी पदिं मुग्ध जुईच्या कळ्या,
श्रीमन्त वर्षिती विलायती पाकळ्या
अन् बड्या–बड्यांच्या लक्ष तऱ्हा वेगळ्या,
असे विजेचे दीप लागता–कुणा आवडे वात ?
खरोखर कुणा आवडे वात ?

रंजनार्थ तुझिया जीव तोड-तोडला
अन् फुलांफुलांतिल गन्ध वेच-वेचला
दिनरात मन्दिरीं उभा खुळा राहिला
ना द्रवले क्षण हृदय तुझे परि, केला जरि आकान्त
सदोदित जरि केला आकांत.
या परी, मंगले, छेदिलेस या उरा
केलास अकारण या हृदयाचा चुरा
अन् कळे अखेरी तुझी आगळी तऱ्हा
तूं सम्राज्ञी ! तुला नावडे कंगालांची जात
नावडे कंगालांची जात.
तव नाद लागतां, दु.ख प्रियेला दिले
तव पदीं रमोनी, तिजला अव्हेरिले
पुसले न एकदां, प्राण जिने अर्पिले
दूर लोटुनी, तिला दाविली तिच्या गांवची वाट
अरेरे ! तिच्या गांवची वाट !
परि कळला कळला मूढपणा मज पुरा
आतां न व्हायची चूक स्वप्निहीं जरा

हा पहा निघालो थेट प्रियेच्या घरां
तिलाच आतां भावसुमे ही ! –तिचाच आतां भाट !
शारदे, तिचाच आतां भाट !

घे सलाम – छे, घे प्रणाम ! –आतां तरी
जरि प्रिया संगतीं–स्मृती तुझी अन्तरीं
फिरकणार नाही परी तुझ्या मन्दिरीं
नव सुमने हीं ! आतां त्यांना निराळीच निरगांठ
शारदे, निराळीच निरगांठ.

# आमुची कलन्दरांची जात

आमुची कलन्दरांची जात
चुलीत ओतुनि पाणी, दिधली संसारावर लाथ
आमुची कलन्दरांची जात.

केंव्हाच सोडुनी दिली गाइ-वासरे
टाकिली करोनी दान चार खाचरे
अन् गावकऱ्यांना दिली मोडकी घरे
आणि निघाला दौडत वारू—कण तेजाचे खात
आमुची कलंदरांची जात.

फेकिल्या पैरणी, तशी दोन धोतरे
पाहिजे कुणाला भिकार ही लक्तरे ?
या जगात आलो जसे – वस्त्र ते खरे !
आणि मोकळा देह घेतला गुंडाळुन वाऱ्यात
आमुची कलंदरांची जात.

रे, सरली नाती आणि सगेसोयरे
सोबतीस आता रानामधले झरे
बांधिली रहाया रविकिरणांची घरे

सर्व पऱ्यांच्या लुटावयाची आता अवघी रात
आमुची कलंदराची जात.

कधिकधी कळ्यांच्या उरीं लपोनी बसू
दावीत वाकुल्या तृणां, खदखदा हसू
वा फुलराणीवर, वनराणीवर रुसूं
आणि धुक्यावर स्वार होउनी धुन्द फिरू गगनांत
आमुचीं कलंदरांची जात.

काव्याचे जडले पिसे अम्हांला सदा
होउनीं धुन्द चुम्बितो शारदा-पदां
शब्दांविण आम्हां रुचे न कांही कदा
नवशब्दांच्या सुन्दर माळा रे दिनरात गळ्यात
आमुचीं कलंदरांची जात.

ना उघडायाचे नेत्र, नको जागृती
नित रमावयाचे स्वप्नांच्या संगतीं
जायचे, जे न सांपडे, तयामागुती
असा आमुचा काव्य-खुळ्यांचा सारा सारा थाट
आमुची कलंदरांची जात.

# क्षणोक्षणि कां वधिसी पामरा ?

कशास दिधले हृदय असे हे, का दिधले ईश्वरा ?
क्षणोक्षणि कां वधिसी पामरा ?
जरि चिता रचाया सज्ज सगेसोयरे,
तोडाया काळिज नित्य परजती सुरे,
मम रुधिर प्यावया प्राण तयांचा झुरे,
परी पुसाया अश्रु त्यांचे ध्यास सदोदित उरां,
क्षणोक्षणि कां वधिसी पामरा ?
जरि कानीं येई गोड लकेरी कुठे
हे हृदय तळमळे साथ द्यावया तिथे
झंकार स्वरांचा खोल अंतरीं उठे,
परी मुखातुन गीत स्फुरेना – जीव होइ वावरा
क्षणोक्षणि कां वधिसी पामरा ?
देखता अहाहा ! हिरवे हिरवे मळे,
नवपंख लावुनी हृदय त्वरेने पळे,
परि दार न उघडे, जीव आंत तळमळे
पंख आपटित वसे पांखरूं, अन् चावीं पिंजरा
क्षणोक्षणि का वधिसी पामरा ?

पाहता अंबरीं दिव्य फुलांचे थवे
हे हृदय करी अुड्डाण वेचण्या जवे
परि पाय पांगळे दौडती न त्या सवे
कां दाव्याने असे बांधिले या अवखळ वासरां
क्षणोक्षणि कां वधिसी पामरा ?

जरि अुरली आता चार मोडकी पिसे
का अुड्डाणाचे अजुनि तयांना पिसे ?
रे, पंख फाटके पाहुनि दुनिया हसे,
कां तेजाचा दीप लाविला अुगा मोडक्या घरां ?
क्षणोक्षणि कां वधिसी पामरा ?

हे दिले, ईश्वरा, कशास असले जिणे
दिनरात मरोनी पुनः जिते राहणे !
शासिले असे का ? – काय जाहले गुन्हे ?
तोड पंख, अन् फोडित डोळे, मार झणीं पांखरा,
क्षणोक्षणि का वधिसी पामरा ?

# अजाण मी !

अजाण मी ! – मज कळे न काही
साधे साधे उमगत नाही
लहान मी का आता, सांगा –
परन्तु काही जमतचि नाही.

ज्ञान न मजला संगीताचे
तालांचे अथवा रागांचे
परी खुळीला एकच ठावे
गीत मनीं नित जपावयाचे.

कळे न कैसा जन्म फुलांना
कुणी अर्पिला गन्ध तयांना ?
वेडी मी, मज एकच ठावे
हृदय सुगन्धी कसे जपावे.

गुपित न ठावे पर्जन्याचे
कळे न गूढहि इन्द्रधनूचे
परी ठाउकी, येता पाउस
नाचत, खेळत भिजावयाचे.

☐ ☐ ☐ माधव का. देशपांडे

देवधर्म ना जमले काही
देउळ मजला ठाउक नाही
येता दारीं कुणी भुकेली
घास तोंडचा देते अपुली.

कशा चान्दण्या वरी हासती,
जरी कळेना, का भिरभिरती
कळे हास्य ते लुटावयाचे
मनीं चान्दणे जपावयाचे.

'जीवन आहे काय वरे हो ?
काय शेवटी या मातीचे ? '
कळे न काही ! – कळे परन्तु
हासत हासत जगावयाचे !

## मराठी भाकर

माझी मराठी भाकर, भारी गोड गोड, बाई
वाटे मराठी जिभेला भावनगरी मिठाई.
कधी पांढरा जोंधळा, दुधावाणी गोरींगोरी
कधी नाचण्या तांबूस, नार सांवळी, लाजरी!
माझ्या मावळचा कान्दा, लाल तेजाचे माणिक
जानी दोस्त भाकरीचा, काय पाहिजे आणिक ?
करी जिभेवरी प्रीत, लाल चटणीचा गोळा
जात पाहिजे मर्दाची पचवाया निखाऱ्याला
काय नाजूक मिठाई घेई वरणाचा चोट ?
काय तूप-रोटी खाई कधी काळे तीळकूट ?
कोणी कापले शत्रूला खात पुरणाची पोळी ?
काय खात पेढेऱ्वर्फी सैन्य लढले मावळी ?
माझी मराठी भाकर, रक्त जागे जागे ठेवी
वीज पाहिजे देहाला ? – हीच मेजवानी खावी.
बाणा ताठर मराठी, नाही कोणाची लाचारी
रक्त वीराचे पोशिते माझी मराठी भाकरी

## चोर कुठे नाही

(असा प्रसंग कोणा स्त्रीवर येऊ नये ! )

हासे न कुणी, देखे न कुणी, कोणी नच बोले,
वाटे, जग फिरले.
रंगविले अधरा, चाखियली मदिरा, बनले मदिराक्षी,
शृंगारित अस्थी.
नेत्रा नव केले, अंजन त्यात खुले, बनले मदनकला,
हसरी चन्द्रकला.
दन्त नवे हसरे, कुंतल कुरळ पुरे, वक्षहि पुष्ट जरा,
शोभे मदन- तुरा.
वसने नव ल्याले, कर्णा भूषविले, उजळे नवकांती
ओठा नव दीप्ती.
कोमल कुसुम जसे, नाजुक हास्य तसे, वदनीं खेळविले
मदनाचे जाळे.
सज्ज अशी राणी, गोड मुखीं गाणी, तोषविण्या सुजना
रंजविण्या रमणा.
अन्ध परी सारे, फुटले कर्ण पुरे, कौतुक ना कोणा
येती ना सदना.

थांबे क्षण कोणी, देखाया राणी, परि पळती वेगे
ना बघती मागे.
काय, गडे, झाले, काय उणे पडले ? श्रम गेले वाया
मूढ पुरी दुनिया.
उघडे धन केले, गमवाया बसले, नवल किती बाई,
चोर कुठे नाही !

## धीर होत नाही

जावा हा दीप अता – आस नुरे काही
आत्मघात करण्या परि धीर होत नाही.
जगलो मी ज्वालेसम
स्फुरलो नित तेजासम
उजळित तम, उजळित तम
स्नेहशून्य ज्योत अता – तेज नाहि नाही
आत्मघात करण्या परि धीर होत नाही...
ये रुद्रा, ये गर्जत,
खड्ग तुझे ये परजित
लपवित मुख वादळात
आणि मार घाव उरीं, होउनी कसाई
आत्मघात करण्या परि धीर होत नाही...
ये विद्युत, ये वेगे
उजळित द्रुत सर्व जगे
वातचक्र घे संगे,
तेजाची खुपस सुरी काळजात बाई
आत्मघात करण्यापरि धीर होत नाहीं...

ये अथवा, ये काळा,
ग्रासाया हा गोळा
स्वप्नीं परि गाठ मला
घे अलगद पंखावर, दावुनी नवाई
आत्मघात करण्या परि धीर होत नाही...

## स्वच्छ चांदणी

जरी यायचे, ये विसरोनी सारे, सारे,
अगदी सारे !
ये विझवोनी गत स्मृतींचे लाल निखारे.
ये झिडकारित पति ज्या लाभे धनचि फुकाचे,
खड्ग वनोनी टाक तोडुनी पाश पिलांचे,
टाक छेदुनी वन्ध रेशमी मायपित्यांचे
ये धावत, सखि, मुक्त विजेसम, हे प्रेमभरे,
जरी यायचे ये विसरोनी सारे सारे
अगदी सारे !
दे फेकोनी दाराजवळी लाज भिकारी, मरो बिचारी !
फेक नीतिची जीर्ण चिरगुटे पायरीवरी,
स्वच्छ चांदणी ! अहा हासरी ये अंधारीं
ये वायूचे वस्त्र घेउनी, ये हर्षभरे
जरी यायचे ये विसरोनी सारे सारे,
अगदी सारे

## आज कळे

आज कळे, आज कळे, गूढ जीवनाचे
मृत स्वप्नां द्यायाचे अर्घ्य आसवांचे
झटलो दिनरात किती
निर्माया ग्रंथ-तती
दंग लेखनात मती
आज भूत वेडावी एकलेपणाचे
आज कळे, आज कळे, गूढ जीवनाचे...
वितराया छात्रगणा
ज्ञानसुधा, छंद मना
गेला ना दिवस सुना
आज परी ना उमले फूल हे मनाचे
आज कळे, आज कळे, गूढ जीवनाचे...
एकलेच मम घरटे
किलबिल ना कानि कुठे
एकाकी हृदय तुटे
सांगावे कोणा परि शल्य अंतरींचे
आज कळे, आज कळे, गूढ जीवनाचे...

## कोण खरा मी ?

विचारिसी मज 'कोण खरा तू ?'
कसे कथू तुज कोण खरा मी
सांगितले परि मीच पाहिजे
कोण वरे मी, कोण परी मी

'मी' पण म्हणजे काय बरे हो ?
'खरे' म्हणावे आणि कशाला ?
चार लाभले क्षण अंधारीं
घे समजोनी त्यातुनि मजला

जुमानिल्या ना प्रयाग–काशी,
मानिला न विश्वाचा राणा,
मानवतेला अर्घ्य वाहता,
सज्ज राहिलो मातृपूजना

जरी हासलो मूढ निंदका
नित्य घेतले जाणुनि त्यांना
मान ताठ ही पोलादासम
उगा न मुजरा केला कोणा

जे पटले, हृदया जे रुचले
धीटपणे ते जगा कळविले
आंग्ल–सुधा जरि नित्य प्राशिली
माय मराठी–तिला वंदिले

जरी भंगली स्वप्ने सारी
करी उन्हाळा जीव घाबरा
कधी न दिसली कुणा आसवे
जरी अंतरी लाल निखारा

जन्मभरी मी आलो उजळित
अज्ञानाच्या वेड्या ज्योती
पोटासाठी आलो खरडित
पांडित्याची उगाच ख्याती

जगी न कोणी गे कोणाचे
सत्य कटू हे मनी राखिले
स्वत:च्याच रमलो सहवासी
आणि आगळे विश्व निर्मिले

□ □ □ माधव का. देशपांडे

या विश्वी नित करीं लेखणी
तिला लाडकी प्रिया मानिले
दिव्य शारदा – पदा चुंबिता
हृदयाचे नित शैशव जपिले

'मी' पण माझे गेलो विसरुनि
काव्य–रसाचे करिता प्राशन
कसे कथू तुज खरा कोण मी
जरीं न उरले माझे मी पण ?

नको विचारू तरी कोण मी
कुणी जाणिले खरे काय ते
कसे जमावे मला, मंगले,
जे जमले ना ज्ञानेशांते ?

## ये चंचलते,

अमरत्वाचा शाप नको मज,
नको नको तो घाव उरीं
मौज क्षणाची–तीच खरी !

जरी न हो निर्माल्य कळीचे,
पुसेल तिजला कोण तरी
चंचलतेतचि मौज खरी.

जरी हांसरे नेत्र सदोदित
कोण यौवना जपे उरीं
जे चंचल, ते भान हरी.

वीज चंचला जाई चुंबित
क्षणैक मेघा–मौज पुरी
नको चुंबने दीर्घ तरीं.

इंद्रधनूची रम्य कुंचली
रोज चालता नभावरी
करी न कोणी मान वरी

जरी लुटाया ये न लुटारु
कोण पुसे जीवना तरी
मरणामाजी जादु खरी.

प्रेम तुझे, सखि, नवकलिकेसम,
चार क्षणांचा खेळ जरी
मौज अहाहा ! त्यात पुरी.

जे क्षणभंगुर, अतिव मनोहर
तयात अमृत खरोखरी
ये चंचलते, येइ तरी.

## उजळिन मी तम माझे

स्फुरु दे मज, हरुं दे मज, माझिया बळाने,
फुलु दे मज, जळु दे मज, माझिया मदाने.
दिव्य तुझ्या स्वरलहरी,
दे फेकुनि वायुवरी
रंजव वा रानपरी
रंजवीन मम हृदया माझिया स्वराने
स्फुरुं दे मज, हरु दे मज, माझिया बळाने
जा घेउनि धन सारे
उचल उचल ते भारे
नागव रे मजसि पुरे
मढविन मी मन माझे आंतल्या धनाने
स्फुरुं दे मज, हरु दे मज, माझिया बळाने
धाडु नका चोर घरां
चोरियला कुणि वारा ?
माझा मी चोर खरा
धन माझे लुटिन मीच माझिया कराने
स्फुरुं दे मज, हरु दे मज, माझिया बळाने

उघडे मज पूर्ण करा,
वायूचे वस्त्र उरां
आमंत्रा जा शिशिरा,
मी खुलेन, मी फुलेन आंतल्या उबेने,
स्फुरुं दे मज, हरु दे मज, माझिया बळाने
फेका रवि–चन्द्र दुरी
ताऱ्यांना हकल तरी
विश्व बुडो अंधारीं
उजळिन मी मन माझे आंतल्या कणाने
आंतल्या बलाने
स्फुरुं दे मज, हरु दे मज, माझिया बळाने
फुलु दे मज, जळु दे मज माझिया मदाने.

# मी मुग्ध किशोरी होते

भेटलास जेव्हां येथे, मी मुग्ध किशोरी होते,
मज कळतहि नव्हते काही, मी अगदी वेडी होते
लक्तरे लपेटुनि देहा नीतीची, तेव्हां लपले
टाळीत तुझ्या नजरेला, भीतीने धन हे जपले
मम मूढपणा मज कळला, आता न लक्तरे देहा
जाहले स्वच्छ डुम्बाया प्रीतीच्या मादक डोहा
मज कळले कळले आता प्रीति न भेकडासाठी
ठावे न मद्य ज्या ऐसे, त्या कशी कळावी नीति ?
ये सख्या, अता भेटाया, हे पुष्प तुझ्यास्तव फुलले
गमवाया सारे सारे, हे प्राण पहा आतुरले !
हे शिल्प स्वच्छ चांदीचे, स्पर्शील दुजा त्या कोण ?
जरि सहस्र जिव्हा डंसल्या, मी तुझ्याच चरणीं लीन
ठेविली अमंगळ काया लक्तरात या मूढेने
परि आता तव स्पर्शाने दरवळेल मांगल्याने.

## येइ उजळित ज्योत

तूच उभारिली वास्तू,
दे रे हात कोसळता,
तूच फुलविली राई
राख तिला तूच आता
तूच केले माते लुळे,
दे रे पाय चालावया,
का रे केलेस आन्धळे,
दे रे डोळे पहावया
तूच हिरावसी वाचा,
आता बोलू कैसा तरी,
गाउ आता सांग कैसा
तूच फोडिली बासरी
तूच झाकिले, व्यापिले,
गाढ तमाने अन्तर,
येइ उजळित ज्योत,
तिला पिऊ दे अन्धार

# आसवे

कळे न माझे मला, उगाचचि का ये गहिवरुनी,
आंसवे का झरती नयनी ?
सांजे फुलां-मुलांचे वेड, गडि खिदळणी,
हासरे चांदणे नित्य राखिले मनी,
स्मितहास्य सदोदित रुचे जनीं वा वनीं,
पहाटचा तारा परि जाता डोळे मिचकवुनी
आसवे का फुलती नयनी ?
मी स्वर-वेडा ! – मज गीत रुचे एकले,
गे वेड स्वरांचे नित हृदयी पोशिले,
ऐकता खगांचे गान प्राण बहरले,
परी पहाटे स्वर भैरविचे मोहरता कानीं
आसवे का खुपती नयनी ?
दिन जरी सणाचा, मोद न मावे घरीं
अमृता न तोटा, गृहराणी हासरी,
कोवळ्या पिलांची नित्य झरे बासरी
आठवता तव अश्रू, माते, येई भडभडुनी
आसवे साकळती नयनी

□ □ □ माधव का. देशपांडे

भोवती मित्रगण, स्नेहामृत पाजिती,
भेटती सगेसोयरे, प्रेम वर्षिती,
नित सन्मानांचे हार भक्त अर्पिती
परी वेगळेपणा उगाचचि जाई दुखवोनी,
आसवे अन् सलती नयनी
का उरा झोम्बतो असा एकलेपणा,
का दंश काळजा, जरी न काही गुन्हा
का उगा अनामिक जागविती यातना ?
काय हरपले, काय लोपले, ना सांगाया कुणी
आसवे मात्र उभी नयनीं

# आसवे

कळे न माझे मला, उगाचचि का ये गहिवरुनी,
आंसवे का झरती नयनी ?
मज फुला-मुलांचे वेड, गडे निशिदिनीं,
हासरे चांदणे नित्य राखिले मनी,
स्मितहास्य सदोदित रुचे जनीं वा वनीं,
पहाटचा तारा परि जाता डोळे मिचकवुनी
आसवे का फुलती नयनी ?
मी स्वर-वेडा ! – मज गीत रुचे एकले,
गे वेड स्वरांचे नित हृदयी पोशिले,
ऐकता खगांचे गान प्राण बहरले,
परी पहाटे स्वर भैरविचे मोहरता कानीं
आसवे का खुपती नयनी ?
दिन जरी सणाचा, मोद न मावे घरीं
अमृता न तोटा, गृहराणी हासरी,
कोवळचा पिलांची नित्य झरे वासरी
आठवता तव अश्रू, माते, येई भडभडुनी
आसवे साकळती नयनी

भोवती मित्रगण, स्नेहामृत पाजिती,
भेटती सगेसोयरे, प्रेम वर्षिती,
नित सन्मानांचे हार भक्त अर्पिती
परी वेगळेपणा उगाचचि जाई दुखवोनी,
आसवे अन् सलती नयनी
का उरा झोम्बतो असा एकलेपणा,
का दंश काळजा, जरी न काही गुन्हा
का उगा अनामिक जागविती यातना ?
काय हरपले, काय लोपले, ना सांगाया कुणी
आसवे मात्र उभी नयनीं

## नको झुरु प्राणा

नको झुरू प्राणा, छे! छे! नको करू खंत,
नको विस्मरू जे कथिती थोर थोर संत
सांगती तुकोबा, वेडया, आपुल्याच पोटी
कर्करोग वाढे आणि प्राण येइ कंठीं
दूर परी रानीं कोठे फुले रानवेल
तीच अमृताची घुटिका, तीच प्राणत्रेल
दूरदूरचे स्वर जुळती आणि जमे गान
झुरे दूर देशी कोणी करी रक्तदान
तोचि प्राण वाही आपुले होउनिया भक्त
गिळी आपुल्या रक्ताला आपुलेच रक्त
विषारी कृमींचे उदरीं आपुल्याच जाळे
नको झुरू प्राणा, वैरी आपुलेच गोळे

## नको डोकवू

नको डोकवू आत उगाचचि
कळायचा ना खोलपणा,
नको दाखवू नेत्र हासरे
कळेल सारा फोलपणा
नुरले आता वेड नभाचे
सरला सारा स्वैरपणा
नको दिल्‌रुवा उगाचि छेडू
अता न उरला धुन्दपणा
नको बोलवू क्षण अंधारीं
रक्त विसरले वांडपणा,
नको काळजा दंश चोरटा,
उरला केवळ वांझपणा
सदाफुली मी नव्हे, नव्हे रे !
फुलायची ना अता पुनः
एकदाच ही ज्योत उजळली
अता तमाचा खेळ जुना

# कळेना कसे आवरु आसवांना

स्मृती आज, आई, तुझी जेवतांना
कळेना कसे आवरू आसवांना...
कशी रावशी आठवे आज सारे
कसे चाखिले यातनांचे निखारे
कसे लाभले ना सुखाचेहि वारे
कशी टाळिशी आसवे हासतांना
कळेना कसे आवरू आसवाना...
कधी अर्धपोटी, उपाशी कधीही
सदा रावता ना विसावाहि काही
मुखाला दुधाचा कधी स्पर्श नाही
किती भागशी राखिता या पिलांना
कळेना कसे आवरू आसवांना...
कसे सोशिले वार तूं निन्दकांचे
तसे नाटकी प्रेमही सज्जनांचे
(कळावे कुणा दुःख ते निर्धनांचे ?)
सुधेचा परी थेम्ब देशी मुलांना
कळेना कसे आवरू आसवांना...

□ □ □ **माधव का. देशपांडे**

दीपावलीचा दिन आज आई
घराघरांतून हसे नवाई
परंतु माझ्या हृदि दीप नाही,
अन् घास जाई न, गे, जेवतांना
कळेना कसे आवरू आसवांना...

## बी अ गुड् बॉय् !

उठा, उठा, पंढरिराया, तोडा पंढरीची माया,
आला पुंडलिकासाठी, वॉट् अ पिटि, वॉट् अ पिटि !
पुरे विटेवरी भार, पोर जाहली बेजार
युगे अठ्ठावीस झाली, गुड लॉर्ड् ! – वाया गेली
वीट आला नाही कैसा, ‘ चेन्ज् ’ पाहिजे थोडासा
डोन्ट् बि सिलि, तातडीनं, निघा गाव ते सोडून
जैसा देव तैसे भक्त, थंड थंड त्यांचे रक्त
पंढरीला नित्य ठाण, चन्द्रभागीं जाई प्राण
ऐसी वांडगुळे झाली, भारें धरती वाकली
काय सांगेल पंढरी, दलितांची दुःखे सारी ?
काय कळे विटेवरी, सले काय त्यांच्या उरीं ?
पुरे आता थंडपणा, उठा उठा नारायणा
बी अ गुड् बॉय्, तरी देवा, सुरु करा जनसेवा
म्हणा पंढरीला ‘ टा टा ’ ! आता उठा, आता उठा

1. What a pity, what a pity; किती खेदाची बाब !
2. Good Lord! बाप रे !
3. Change हवापालट
4. Don't be silly ! वेडेपणा करू नका !
5. Be a good boy ! शहाण्यासारखे वागा !
6. Ta ta ! अच्छा, राम राम !

□ □ □ माधव का. देशपांडे

## ये राणी तू अशी घरी

सावरीत रात्रीचा बुरखा,
वायूची ओढणी उरी
ये राणी, तू अशी घरी
नको, नको, गे दीप संगती
नेत्र सांडिती तेज पुरे
नकोहि आणू अत्तर संगे
गंध मुखातिल पुरे पुरे
नको बासरी अथवा वीणा
हास्याचे मधु गीत पुरे
नको वदाया काही काही
श्वासाचे नवबोल खरे
शिशिर जरी आहे बाहेरी
तव प्रेमाची ऊब पुरे
नको कंकणे, कर्णभूषणे
देहाचा दागिना पुरे
असा असा श्रृंगार करोनी
अन् प्रीतीचा दीप करीं
ये राणी, माझिया घरी

# रोज नवी नवी कळी !

(रोज झोपी जातांना वाटायचे की
प्रतिभा आटली, कवितेचे विषय संपले, पण–)

येइ कुठोनिया धन, येइ कुठोनिया धन
कुबेराच्या भांडाराला कोणी मारियेला घण ?
सारे संपता गांठीचे, वाटे रिता झाला खिसा,
जाणी पहाटचा वारा पुनः भरलेला कसा
नभीं काळे काळे मेघ, वाटे संपले किरण,
येइ पहाटचे दंव घेवोनिया तेजोकण.
कोमेजता लता–फुले, वाटे संपला आनंद
तोच पहाटचा वारा आणी कलिकेचा गंध,
झरे कोरडे कोरडे, प्राण जाहला घावरा,
उन्हे सकाळची तोच हासविती नवा झरा,
दिन आले उपासाचे, आता रिकामीच झोळी,
हात घालिता ये हातीं तूपसाखरेची पोळी
देवा कृपा तुझी थोर, देशी द्रौपदीची थाळी,
लतेवरी माझ्या डोले, रोज नवी नवी कळी.

# हे अश्रू

तूच नव्हे कां, आई, चिमणा घास मुखी भरविता
दिलीस करूनी अक्षर-ओळख, मजसंगे खेळता ?
थोर कृपा ही तुझी ! शोभली नित्य लेखणी करीं
आज, न आई तू देखाया वैभव सारे परी !
दु:ख कोन्दता उरी धावलो तुझ्या आसवाकडे
आज माउली, परी जाहले अनाथ माझे रडे
चरण तुझे सेविता मनाचे शैशव होते खडे
कळले नाही कसे अंतरा पडले होते तडे
उजाड आता सारे सारे दुरावली साउली
आता कोणत्या कुशीत लपवू हे अश्रू माउली ?

## सारा अंधार, अंधार !

तुझे साधेभोळे रूप, मन तयावरि जडे
शांत बोलणे-चालणे, किती गोड वाटे गडे !
संथ शालीनता तुझी, जणू पाडी मना भूल
तुझ्या नयनांची वाणी, सांगे काहितरी खोल
शोभा देइ गोड रूपा, तुझा साधा साधा वेश
रम्य लावण्याला नाही, नाही दागिन्यांचा सोस
मृदु नेत्रामाजीं तुझ्या, स्फुरे पावित्र्याची ज्योत
सौम्य स्मितामाजी तैसी मंद मंद सांजवात
पहाटचा गार वारा गोड गळ्यावरी खूष
तुझी ऐकिता भूपाळी, होई रोज तो बेहोष
तूचि वात्सल्याची गंगा, नित्य खुले तुझे दार
अश्रू देखिता कोणाचे, तुझ्या आसवांना पूर
गंध लाभला पुष्पांना, तुझ्या गडे अंतराचा
दुधा लाभला गोडवा, रम्य तुझ्या भावनांचा
जगामाजी या बेगडी आगळा हा साधेपणा
शोध-शोधता ना दिसे कोठे छद्मी फिल्मीपणा
तूच खरी विश्व-माता, खरा जगाचा आधार
तुझ्यावीण देवी जगीं सारा अंधार अंधार

# मला कवि नाही व्हायाचे

न कळे मज काव्य, मला कवि नाही व्हायाचे,
रचित शब्द शब्द उगा क्षण ना दवडायाचे
सृष्टीचे रस मजला बोलाविति प्रेमभरे
टाळित ते अमृतघट, शब्द काय वेचु बरे ?
हसत हसत रम्य उषा स्वप्न कथी मज मनिचे,
शब्द खुळे कथिती कसे, गुपित तिचे अन् रविचे ?
विलगत मज नवकलिका रुसुनि वदे काहीतरी
हितगुज ते उकलाया शब्दांच्या वल न उरीं
घेउनिया गंध मुखी गंधवाह ये सदनी
मन त्याचे जाणाया व्यर्थ व्यर्थ कवि-वाणी
फिरता वनि विहग मला ऐकविती प्रेम-कथा
कथिति कसे, शब्द लुळे, त्यांची ती दिव्य व्यथा ?
आणि तृणे, वृक्ष-लता स्फुन्दति जे जे रानीं
दु.ख ते अबोल कसे शब्द नेति रसिक-मनीं ?
सृष्टीचे रूप रुचिर धुंदवि मज, लावि पिसे
जे अमोल, अनुपम जे शब्दांकित होई कसे ?
जगण्याचे वेड मला, वेड मला जगण्याचे,
जगतो मी काव्य, मला कवि नाही व्हायाचे

# नको धरू पंख माझे

नको धरू पंख माझे, आहे चंचल पाखरू
नको रोखू जाळ्यामाजी, जीवनाचा यात्रेकरू
उनाड हे रक्त माझे, रूचे तयाते भ्रमन्ती
क्षण नाही विश्रांतीचा, तीच तयाची विश्रांती,
हावरे ते पुरे पुरे, मागे सर्व काही काही
सारे लाभता यापरी, पुनः उपाशीच बाई !
रानारानातून भ्रमे, लक्ष फळां मारी चोच
उनाडाला नको नको तीच बाग, मळा तोच
नित्य मागते हावरे, नवे मळे नवी जळे
नवे रंग नवे संग मेघ नवे नवे निळे
कधी इन्द्रधनूवरी, सागराच्या कधी उरीं
कधी गाठी निळी दरी, कधी स्वर्गंगेच्या तिरीं
ध्यास तयाते नभाचा, कोवळ्या गे चांदण्याचा
लोभ हासऱ्या चन्द्राचा, नव्या नव्या क्षितिजांचा
नको नको घालू बांध, आहे वाहते हे जळ
वेडे वाहते हे असे, म्हणोनीच ना निर्मळ ?

## चार क्षणांचा खेळ, गडे!

चंचल या जगिं, काय अचंचल ?
चार क्षणांचा खेळ गडे,
अंधाराचे राज्य पुढे·
पहाटचा तारा क्षण हसता, हासे कलिका गोड गडे
सायंकाळी प्राण झडे.
पर्जन्याची सुधा चाखता, इंद्रधनूला पडति तडे
क्षणांत त्या रंग उडे
नको दाखवू वक्ष, यौवना, वडा चोरटा वाग खुडे
निर्माल्याचे पडति सडे.
ज्योत जपावी दो हाताने, वायू फुंकर मारि गडे,
मातींमाजीं तेज पडे.
चार जणांचा खेळ पुरे हा, जीव जरी धुंदीत बुडे,
चार क्षणां रोखीत, गडे.
ये तरि उमलत, ये स्वर उधळित, हासत हासत रमू गडे
कळे, जायचे जरी सडे
कळे, न काही काहि पुढे.

## दूरपणातचि

नको बोलवू जवळी अगदी,
दूरपणातचि आहे गंमत,
निकटत्त्वाच्या नको शृंखला,
दूरपणातचि सारी जंमत

जोवरि जपिले पुष्प मनींचे,
गंध अमोलिक जाई वर्षित,
जो वरि येती ओष्ट न जवळी,
चुम्बनातली सारी रंगत

जोवरि नाही गुंफियले कर,
दो हृदयांचे जुळेचि संगित,
श्वास लोपता श्वासामाजीं,
जाई मीलन खंगत खंगत

येता कानी दुरुनि स्वराली,
फुले भावना, होई गन्धित,
स्वर चुम्बियता ओठावरचे
क्षणात जाई जादू भंगत

असेच आहे सारे सारे
जवळपणाची रुचे न संगत
निकटत्त्वाचा स्पर्श सहेना
दूरपणातचि सारे इंगित

# आसवांत भिजलेले ते स्मित!

चार ऐकुनी कविता माझ्या,
कंठ तुझा ये अवचित भरूनी
ओठावर मंदस्मित फुलता
नेत्रहि आले नकळत भरूनी
गूढरम्य ती ओली भाषा
गुपित तियेने कथिले मजला,
सांगितले मज सारे, सारे,
जे ऐकाया कवि आतुरला.
अबोल ती नव गोड आसवे
गेली बोलुनि शब्दावाचुनि
आसवांत भिजलेले ते स्मित
गेले अद्भुत काही कथुनी.
त्या ओल्या हास्यात अहाहा!
वैभव आहे माझे राणी
वेळ कुणा आहे ऐकाया
मत्सरग्रस्तांची रडगाणी?

# घराघरातुनी जळती सीता

सांग सांग हनुमंता सत्वर
तूच जाळिली लंका नगरी ?
सूर्यबिंब ग्रासाया जाशी
तूच करीं नेला द्रोणागिरि ?
उगा लाभले हे बल वाटे
उगा प्रशस्ती तुझ्या बलाची
तोच रानचा वाघ, शूर तो
चीड जयाते अन्यायाची
जनसेवा हे व्रतचि जयाचे
त्यजी स्वपत्नी धनी जेधवा
पुच्छ उभारित संतापाने
का न छेडिले मूढ राघवा ?
खड्ग विजेचे मुखी ठेवुनी
गर्जत गर्जत वनराजासम
का न रोखिला अयोध्यापती
चिडलेल्या झंझावातासम ?
" काय गुन्हा होता साध्वीचा

का त्यजिली विश्वाची माता
जबाब द्या मज, जबाब द्या मज
का अवमानियली मंगलता ?"
का दरडावित असे न पुशिले
काय जाहले असे डराया ?
वाघ कागदी असेच आजहि
सलाम त्यांचा नित अन्याया
रामायण ना अजुनि संपले
असेच आजहि धोबीदादा
कंट्रीं चाखित चाखित प्रेमे
पतिव्रतांचा करिती चेंदा
आजहि दिसती राम कृपाळू
घराघरातुन जळती सीता
लोकरंजना लोकरंजना
चुम्बिति ज्वाळा त्यांच्या प्रता

# येई पहाटचा तारा

येई पहाटचा वारा, येई पहाटचा वारा
थंड थंड त्याची मिठी, कस्तुरीचा गंध ओठी
खात रेशमाचा चारा, गुदगुल्या करी उरा
येई पहाटचा तारा, येई पहाटचा तारा,
जाई कलिकेचा रोष, होई खूष होई खूष
उमलती तिचे प्राण, देई कोवळे चुंबन
तिच्या मुखी लपे गंध, मागे हासरा चोरटा,
धन लाभता गे पळे, चोरी करोनी गोरटा
नाही पहाटचा वारा,
चंदनाची मिठी परी,
नाही पहाटचा तारा,
कोण हरी गे कस्तुरी ?
नाही पहाटचा वारा,
फुटे तरी सुधा-घट,
नाही पहाटचा तारा,
धन लुटे ग चावट.

## सजा जाहली

करपटलेले मित्र भोवतीं
कळकटलेले नातेवाईक,
गुणगुणती नित डास भोवती
हास्य जयांचे आस्थेवाइक

येई साहित्यिक–मेळावा
उगा चावरे रक्त जयाचे
येती संपादक अन् दे. भ. हि.
बदनामी हे व्रतचि जयांचे

नित्य भोवती रंगित रमणी
‘डेन्चर’ ज्यांचे हले बोलता
पतिनिष्ठेच्या कथा सांगती
पदर ढळे नित हासहासता

येती याचक, येती श्रावक,
चहाबाज वा विडीबाजही
येति देवता, संसाराचा
पाश जयाते सहन न होई.

येती धनिकहि मोजित नोटा,
सवे रखेली, काव्या निन्दित
डोक्यामधले चार वटाटे
प्रेमभराने तिजला दावित.

किती थोरवी वदू तयांची!
थोर जनांची नित्य कुचेष्टा
ना आदर, ना कौतुक काही
नित्य मुखी निन्देची विष्ठा.

चाखचाखता मेवा असला
घसा कोंदतो ओकारीने
सुगंध मनिचा असा प्रगटता,
प्राण घाबरे दुर्गंधीने.

× × ×

जरी जन्मतो हरिण वनीचे
अहा ! लाभत्या हिरव्या राई,

नेत्र बदामी, देह सुन्हेरी,
हरित तृणाची मुखीं मिठाई.

खेळगड्यांच्या संगे ऐकत
गोड गोड पक्ष्यांची गाणी
प्यालो असतो वनराणीसह
थंड झऱ्यांचे साखरपाणी

पर्जन्याच्या निर्मळ धारा
फूलपाखरासंगे प्राशित,
फिरलो असतो वनावनातुनि
हिरव्या हिरव्या वेली चुम्बित

करवंदीच्या जाळीमाजी
मातेसंगे मजेत खेळत
टिपली असती रात्र चांदणी
गार मखमलीवरती लोळत

पहाटचा मोहरता वारा
कळ्या–फुलांची गाठ अगोदर,

पहाटचा चमचमता तारा
दवबिंदूचे स्नान मनोहर.

आणि प्रियेसह हिंडहिंडता
देखित चाखित राज्य फुलांचे
तिला भरविले असते प्रेमे
घास कोवळे चार तृणाचे.

असेच केव्हा घेत विसावा,
रविकिरणांच्या पडुनी पाशा,
व्याघ्र भुकेला ये सरसावित
क्षणात झाला असता फडशा !

नित्य इच्छिले असले जीवन,
—लखलखणारी वीज क्षणाची !—
मरगळलेल्या, चुरगळलेल्या
सजा जाहली नित मरणाची!

# पहाटच्या अंधारीं

पहाटच्या अंधारीं होतो
असाच काही स्वप्ने देखित
सूक्ष्म ध्वनी तो ये कानावर
मेज नवे मम होते बोलत

म्हणे, " जाहली दशवर्षे त्या
होतो सुंदर वृक्ष वनीचा
हिरव्या हिरव्या फांद्यावरती
ये मेळावा लक्ष खगांचा

येता वायू घेउनि अत्तर
तया घेतली मिठी मारुनी
खेळविता त्याते अंगावर
खूष पुरी होई वनराणी

येति पाखरे नाचत-डोलत
दिले तयाते साखरपाणी
धुंद होउनी डोलडोलो
ऐकत ऐकत त्यांची गाणी

□ □ □ माधव का. देशपांडे

येता हासत उषा पहाटे
सज्ज राहिलो नित्य स्वागता
येता पाउस, हर्षभराने
नाच नाचलो स्नान चालता

येता गर्जत वादळवारा
दाद दिली नाही बेटचाला
वीज चंचला येता हासत
टाळ-टाळिले चेटकिणीला

आणि पाजिली श्रांत यात्रिका
गार सावली, हात धरोनी
घाबरलेली खार पाहता
कुशीत तिज घेतले जपोनी

सकाळ होता फूलपाखरे
येती काही मागायाला
देता काही गोड जराशी
होई मग फौजेचा हल्ला

यापरि गेले दिन सोनेरी
रविकिरणांची गुपिते ऐकित,
गंध फुलांचा चाखित चाखित
दूध चांदण्यांचेही प्राशित

एक दिनी परि आले कोणी
नजर वाटली दुष्ट अमंगळ
होता व्यवहाराची भाषा
मनीं उठे भीतीचे वादळ

येती खाटिक, कुऱ्हाड हातीं
घाव बैसला थेट उरावर
थरथरलो अन् विव्हळलो किति
आणि टाकिला देह धरेवर

जीवनरस मग कसा उरावा ?
शुष्क रोडका देह जाहला
सुतारदादा येती प्रेमें
हातीं करवत, यमचि भासला !

कापकापिले काळिज त्याने
चिरीत जाई अतिप्रेमाने
फिरता करवत हृदयामाजी
प्राण सोडिला कणाकणाने

प्राण यापरी जाता जाता
त्राण उरे ना स्फुंदायाला
नेत्र कोरडे, नुरले अश्रू
उरले नव्हते रक्त वहाया

सुतारदादा कला दाविती
खिळे बैसती अन् छातीवर
चोपडता सोनेरी पॉलिश
आले जन्मा मेज मनोहर ! "

घड्याळ वाजे, स्वप्न भंगले
मेज परी नेत्रा ना दिसले
शव दिसले–कोणाची करणी ?
आणि आसवे सलली नयनीं.

# ऐकिलेस का,

ऐकिलेस का, जरि न ऐकिले, ऐक पुनः तरि
नको मला ती प्रीत चोरटी, खुळी, बावरी.
प्रेम, गडे, तेजाचा तारा, भय न तयाला
ढगाआडची नव्हे लाजरी ती चन्द्र-कला.
ये होवोनी वीज नाचरी, करात प्याला
मद्य लाल ते, हासत जगता, लाव मुखाला.
नको वाजवू कडी चोरटी, भीत जगाला,
नकोहि भेटू घेत सोबती अंधाराला.
ये होवोनी धुंद वनीचा वादळवारा,
कुणा पाहिजे कोमटसा पंख्याचा वारा ?
दे मजला धन वाटे तुज अभिमान जयाचा
कधी न जमला खेळ चोरटा शर्विलकांचा.
नावडती मज डांव छुपे ते मूढपणाचे,
ये, ये हासत वेधित रविसम लक्ष जगाचे.

## सभ्य माणसे आम्ही

पहाटचा क्षण अचूक साधित
मीही जातो फिरावयाला,
एकहिं दिन परि नाही, जन हो,
ओव्हरकोटावाचुन गेला.

कानावरती शोभे मफ्लर,
स्वेटरही छाती सांभाळी,
पाय रक्षिती जुनाट मोजे,
कफनाशक अन् खिशात गोळी

पर्वतिचे क्षण घडता दर्शन,
सात–वीसला वळावयाचे,
मंडईतली ताजी भाजी
मिरवित हाती परतायाचे.

चिरीत भाजी, करीत भाजी,
तशीच आणिक थोडी सोजी,
दिवस मावळे कळे न कैसा
संसाराचा थाटचि ऐसा.

सायंकाळी थोडे, कीर्तन
थोडे कौतुक अन् देवांचे,
आठ–वीसला ठीक परंतु
पाटावरती वसावयाचे.
' सुखसंचारक ' दहा वाजता
थोडेसे गीतेचे वाचन,
दहा–तीसला मिटती नेत्रे
चाल चालता थोडे चिंतन

× × ×

शाळेमाजी होतो शिकलो
भूमीतीच्या नामी रीती,
अचूक पडती त्या उपयोगी
आयुष्याच्या वाटेवरती.
कधी न कलला कट्ट्यावरती
बिड्या फुंकण्या उनाडटप्पू
आणि भेटता दोस्त गावचा
कधि न मारिला असभ्य टप्पू.

कधी न चळलो, कधी न ढळलो,
सभ्यत्वाचा अमुचा पेशा
गृहराणींच्या पवित्र कानीं
कधी न पडली चावट भाषा.

कधी न बनले रक्तहि बेछुट
भगिनीसम गमली निजपत्नी,
कधी न झुरलो कोणासाठी
ठावा ना व्यभिचारहि स्वप्नीं

कधी न हसलो मनापासुनी
कधी न रडलो वा खळखळुनी,
सभ्य माणसे आम्ही, आम्हां
नको तमाशे असे जीवनीं.

कधी न केली मारामारी,
कधी न धरिला हात खलाचा,
सभ्य माणसे आम्ही, आम्हा,
रुचे न वापर असा बलाचा

कुणी मरावे देशासाठी ?
संसारीं लाभे संजीवन,
परी न चुकले शिवरात्रीला
लोकमान्य टिळकांचे दर्शन·

कशास व्हावे शिक्षण–बिक्षण ?
‘ चूक ’, ‘ मूल ’ ते अपुले बरवे
पूजक आम्ही थोर गुणांचे
नित्य पूजिले अण्णा कर्वे.

उंच कड्यावरूनी ना केव्हा
सूर मारिला पाण्यामाजीं
वेड घेऊनी उगाच कसले
कधी न बुडलो स्वप्नामाजीं

सभ्य माणसे आम्ही, आम्हा,
शीळ न जमली रस्त्यामाजीं,
वात्रट अथवा चावट मैत्री,
वा थोडीशी भाषा पाजी.

49300 काव्य
20/2/08
2935

फूलपाखरामागे धावत
कधी न गेलो वेड्यावाणी
कधी न फिरलो कैफ चढोनी
वेडीविद्री गातचि गाणी

नित्य प्राशिले कोमट पाणी
थंडीची बाधा टाळाया,
नित्य राखिली छत्री हातीं
ऊन–पावसाते खिजवाया.

कधी न गेलो धावत धावत
बँड जरी रस्त्याने वाजे,
कधी न फिरलो बागेमाजीं
हातामधले काढुनि मौजे

कधी न फिरलो उगाच रानीं
वृक्ष–लतांना सांगत गोष्टी
कधी न राही छाती उघडी
न्युमोनियाची वाइट दृष्टी.

पाय टाकुनी जळात बसती,
उनाड बेटे, पुरे मवाली
खुशाल गाती आणि लावणी
नको जिणे हे असे वकाली.

कधी न केली शिकार रानीं
कधि न रानचा प्यालो वारा
शिकार केली घरीं, रोखिले,
सापळ्यामधीं उंदिर तेरा.

टाळटाळिली नित्य विमाने
जरी कोसळे, प्राणचि जाई,
बरी आपुली रेल्वे–ताई
झुक् झुक् झुक् झुक् घेऊनि जाई

ब्याट आमुची स्ट्रेट् अशी ही
कधी न जमले पट्टे अडवे,
नको मद्य, पंचामृत आणा,
धोपट जीवन अपुले वरवे.

## एकदा भेटून जा

संपले नाते जरी अन्,
ऊब नाही काळजा,
एकदा भेटून जा
एकदा चुम्बून जा.

भेटलो कोठेतरी, होते कळी मी तेधवा,
" प्रीत आहे काय कोडे ? " ना कळेही जेधवा,
मूढ होते, अंध तैसी,
वाहिले या पंकजा,
एकदा भेटून जा.

चुम्बुनीया हात माझे, रात्र होती चांदणी
चुम्बिले तू नेत्र माझे, आठवे का अंगणीं ?
रंगले स्वप्नीं तुझ्या रे,
स्पर्श ठावे ना तुजा,
एकदा भेटून जा.

धुंदले संगे तुझ्या मी, काय नाही अर्पिले ?
रंगले गानीं तुझ्या, अन् प्राण माझे वाहिले.

भाळले वेड्यापरीं अन्,
भोगते आता सजा,
एकदां भेटून जा.

रे, मुलींची जात भोळी, वेडपी अन् भाबडी,
जाउनी जा सांग त्यांना, "प्रीत आहे बेगडी,"
का उगा होशी शिकारी,
वेधिले या सावजा,
एकदा भेटून जा.

प्रीत नोहे मूढ क्रीडा, चंचला मेघांतली,
प्रीत नाही आंधळी, वा बाहुली खेळांतली,
प्रीत, वेड्या, भावगंगा,
नित्य वाहे शैलजा
एकदा भेटून जा!
एकदा चुम्बून जा!

## तुज कळायचे नाही

नको त्रास घेऊ, बाई
तुज कळायचे नाही,
कळायचे तुज नाही.
टाळ-टाळतो सज्जना
रुचे खलांची संगत,
हीच हवी भिक्षा मला
हीच टाका हो झोळीत,
भिक्षेची का परी घाई ?
–तुज कळायचे नाही.
दारीं कलिकांचा वृंद,
अमृताला नाही तोटा,
परीं मागल्या पायाने
पळे हळूच चोरटा
थेट गाठितो कां राई ?
–तुज कळायचे नाही.
उलटली नाती-गोती
रक्त मागती प्यावया,

उलटता दैव त्यांचे
जातो आसवे पुसाया,
का गे टाळितो लढाई ?
—तुज कळायचे नाही.
नको चांदण्यांचे हास्य
नको चंद्रम्याचा स्नेह,
थंड सुधा ती प्राशिता,
अंतराचा होई दाह
अर्थ काय याचा, वाई ?
—तुज कळायचे नाही.
नुरे संसाराचे वेड,
हास्य रात्रंदिन रडे,
गेली वेडे सारीं, सारीं,
जीवनाला गेले तडे
काव्य—वेड का न जाई ?
—तुज कळायचे नाही,
कळायचे तुज नाही.

□ □ □ माधव कां. देशपांडे

## नवल

खेळ तुझा हा, भ्रमवी चित्ता,
क्षणोक्षणी तो गर्व हरी
अगम्य लीला तुझी, अनंता,
विस्मय दाटे नित्य उरीं

निद्रेमाजीं जीव लोपता
पुन्हा जागृती कशी वरी
जाग तयाला कुणा करीं ?

देह मानवी वने कणाने
थेंब एकला सूक्ष्म जरी
ज्योत उजळिली कुणी तरी ?

या वेड्या अस्थी–स्नायूतुन
कशा उमटती स्वरलहरी ?
दिव्य गान ते भान हरी!

शब्द खुळे, अन् लुळे पांगळे !
काव्य मनोहर वने परी
हर्ष न मावे रसिक–उरीं

भंगभंगता स्वप्नें सारी
ज्योत आतली स्फुरे परी,
राखेमाजीं उव पुरी.

ही नवलाची, दुनिया साची,
तुझी, अनंता, खरोखरी
कुणा उमगली जादुगिरी ?

## माझी रीत

ऐसी आहे माझी रीत, आहे ऐसी माझी रीत,
ऐका सांगतो गुपित.
माझ्या आनंदाची कळी, फुले आसवांच्या उरीं
हास्यांतून वाहताती, नित्य वेदनांच्या सरी
येता संतजन घरां, असंताना घेतो आत
ब्याद टाळीत साधूंची, दुर्जनांना देतो हात
सर्प चावता चावता, विष बैसतो चाटित,
लुटारूंची येता फौज, धन बैसतो वाटित
स्वप्ने भंगता भंगता, मनीं ना मावे उल्हास,
क्षण येता साफल्याचा, चित्ता वाटते उदास,
जाता सारे सारे काही, दिन तोच वैभवाचा,
धुंदे स्वप्नामाजी प्राण, क्षण तोच जागृतीचा
ऐसी वेडी माझी रीत, मूढ ऐसी माझी रीत
ऐकिले ना हो गुपित ?

# झोपले बाळ माझे

कुजुबुजू नका बाई ! झोपले बाळ माझें
मिचकवू नका डोळे, येईल जाग ना, गे ?
हासरे ओठ बघण्या छे ! नको, गडे, गर्दी
घालते आण तुम्हा, आवाज नको अगदी
यायचे जरी, पवना, घेउनी अत्तराते
जा हळूच लावोनी, झोंपल्या सोनुल्याते
पाजळू नको, दीपा, साण्डीत असे तेजा
नाचवूं नको डोळे, स्फुन्देल बाळ माझा
द्यायचे जरी सुमना, वायूस चुम्बनाते
हालवू नको ओठा, दचकेल बाळ छोटे
हम्बरूं नको, कपिले, जरि फुटे तुला पान्हा
पोचता साद कानीं, उघडेल नेत्र कान्हा
धडधडू नको वेगे, विनविते तुला, हृदया,
रेशमी पापण्यांची, जाईल गस्त वाया !

# तू जलद दयेचा

तू जलद दयेचा खरा खरा
करूणेचा संतत स्त्रवे झरा
ठेविलेस ना कधी उपाशी
कायमची मी जरि आधाशी
जे जे मागितले ते देशी
ना कडी ठाउकी तुझ्या घरा
तू जलद दयेचा खरा खरा.
पाय पोळता कधी दुपारी
गुलाबपुष्पे पसरशि दारीं
आग भडकता कधी अन्तरीं
चन्दनी लेप नित तुझ्या करां
तू जलद दयेचा खरा खरा.
जरी बोलले कठीण वाणी
तुझ्या मुखीं परि हसरी गाणी
रंजविली नित वेडी राणी
मी फूल जुईचे तुझ्या करां
तू जलद दयेचा खरा खरा.

कळ्याकळ्यांतुनि मज खेळविले
सुमगंधाचे मद्य पाजिले
अमृत-डोहीं मज शांतविले
परि घात जाहला पुरा, पुरा
तू जलद दयेचा जरी खरा.
असा जागता तुझा पहारा
धजे न स्पर्शायाही वारा,
तव करुणेच्या सहस्र धारा
कोन्दिती प्राण, रे, प्राण उरां
तू जलद दयेचा खरा खरा.
कोंडिलेस पंजरीं प्रीतिने,
वन्दिवान मी तुझ्या दयेने,
तोडिलेस मम पंख कृपेने,
रे, थाम्बव हिंसा अता जरा
तू जलद दयेचा खरा खरा.

# घे उंच भरारी

घे उंच भरारी वेगें—जा स्वर्गंगेच्या काठीं
ओढणार नाही मागे, जरि दोरी माझ्या हातीं.
भेटेल उर्वशी तेथे, वा रंभा गोड गळ्याची
रुसणार परी मी नाही,—चाखितां स्तनाग्रे त्यांची
विनवीन येथुनी त्यांना,— ‘ गे, चुम्बा माझा राणा;
दावीत केतकी छाती, धुंदवा लाडका कान्हा ! ’
जरि रुचे तुला, मनरमणा, सागरीं रमाया केव्हा
निःशंक उडी पाण्यात घे, रुचेल जेव्हा जेव्हा
जा डोलत डोलत खालीं, परजीत शस्त्र मदनाचे
प्राशाया घट भरलेले, आतुरल्या जलकन्यांचे
चुम्बीत देह चान्दीचे,—का वस्त्र सागरीं कोणा ?—
सेवीत प्रवाळे त्यांची, ये अचूक लुटुनी दाना.
या परी रमावे, राया, तू हीच लाडकी आस
तुज कैद नको वाटाया, प्रीतीचा माझ्या पाश
मज नलगे काही काही,—मी वेडी प्रीतीसाठी
ओढणार नाही मागे, जरि दोरी माझ्या हातीं

# तो स्पर्श !

भेटलीस मज अशीच, व्याख्यानीं मम, कोठे,
नाठवते केव्हा ते, आणि कशी, आणि कुठे
पहिल्या रांगेत तुझे टिपले मी रुप गडे,
आवडले नेत्र तुझे, मज त्यांचा मोह पडे.
ऐकिलेस वच माझे--होते मम लक्ष सदा,
'प्रीतीची दिव्य कळी'---होता हा विषय तदा.
' प्रीतीचा खेळ गूढ, नित अबोल प्रीत खरी "
यापरि मी सांगितले काहि तरी, काहि तरी
होउनि गंभीर जरा, राहिलीस तू बसुनी,
चित्रासम स्तब्ध पुरी, जाती जरि जन निघुनी.
होतो मी जात, तोच येउनिया जवळ त्वरें,
देशी हातात हात, अश्रुबिंदु नेत्रि झरे.
स्फुरला ना शब्द मुखीं, थरथरले ओठ परी,
अंतरिचे वादळ जणु सरसावित येइ वरी.
वदता नच काहि परी, जाशी अवचित निघुनी,
स्पर्श तो विलोल परी ठसला या मूढ मनीं.
पुसले ना नाव तुझे, पुसले ना गाव कुठे

आजहि ना ठावे मज, नाव काय, गंध कुठे ?
सरला संसार, आणि स्वप्नेही सडति पुरी,
स्पर्श तो अमोल परी, राखी, सखि, ऊव उरीं.
आठवती नेत्र तुझे, आठवतो अश्रुबिंदु,
आठवतो स्पर्शहि तो, प्रीतीचा जणु सिंधु.
तप गेले होउनिया, गेला द्रुत काळ कसा!
अमृतमय स्पर्श, गडे, विसरु कसा, विसरु कसा ?

## कोण बरे हा ?

विवाह त्याचा होता झाला,
लग्न परी झाले नव्हते
जरी पाउले जाती चालत
भूमीवरती पद नव्हते.
जरी रिकामे खाते अवघे
कधी परी न: धन सरले
जरी रिकामे पोट सदाचे,
हास्य मुखीचे ना विरले.
कधी न शय्या जरी फुलांची
फुलासंगतीं जन्मभरीं
जरी न ठावे मद्य काय ते
रात्रंदिन बेहोष परी.
जरी न ठावे, कधी लढाई,
युद्धचि केले नित्य परी,
कोण बरे हा, कोण असा हा ?
—सांग, गडे, मज सांग तरी!

# अमृत घट

आज कळे मज, आज कळे मज, तव लीला ईश्वरा,
का योजियल्या, का साकळती, लक्ष वेदना उरां.
नव्हे यातना, अमृतघट तो, देई नव जीवना,
थोर गुरू तो शिकवी कैसे उजळावे नित मना.
कसे कळावे, अजाणतेला, का येती वेदना
कशा फुलविती सुमन मनाचे आत्म्याच्या यातना ?
लाल लाल ज्वाळात फेकिशी का वेडचा वासरा ?
कळे, अनंता, मारिलास का हा तेजाचा सुरा.
आज कळे नव अतर्क्य लीला, का अश्रू-योजना
कसे फुलावे हास्य-कमल, अंतरी, आसवाविना ?

# असा तूं अद्भुत जादूगार,

[ ईश-कृपेने नरदेह लाभला म्हणून ठीक ! –नाही तर ?]
थोर तुझे उपकार, दयाळा, थोर तुझे उपकार
तुझ्या दयेने मम चैतन्या सुभग किती आकार !
दिव्य मनाचे रत्न करोनी नरदेहावर स्वार
आणिलेस देखण्या मनोहर सृष्टीचा संसार
जरी लाभते दैवगतीने दुर्बल कायागार,
काय करावे तयें वाहता जड अस्थींचा भार ?
बरा न झालो पान तृणाचे, खात पदाचा मार
बरा न झालो कीटक–केवळ भूमातेला भार
धन्य धन्य मी ! –घूक न झालो मैत्रीला अंधार
बरा न झालो दीन मेंढरू, खात सुरीचा वार
जरी जन्मतो वृक्ष, घेउनी भूमीचा आधार
कसा तारकांसवे करू मी गगनीचा संचार ?
मिळे देह मानवी ! –असा तू अद्भुत जादूगार,
युगे युगे लाभेल मला का अशी कृपेची धार ?

## रामू दाते

परळगावचा प्रेमळ प्राणी, वय सत्ताविस, रामू दाते
मॅट्रिक होता तया बोलवी, रेल्वेमाजी पार्सल-खाते·
कसा असावा सेवक सांगा ? “श्रीरामाचा जसा मारुती ?”
छे ! छे ! छे ! हनुमाना हरवी, पार्सल-स्वामीचीही ख्याती.

अखेर होई तिकिट-कलेक्टर, रामू अमुचा लोकलवरतीं
अतिव श्रमाळू सेवक म्हणुनी, पसरे त्याची लोकलकीर्ती

पगार होता जरा बरासा, पिते वधूंचे झाले प्रेमळ,
जया घरीं धन वहु कन्यांचे, नजर तयांची अखंड कोमल.

आणिक थोडी मिळता बढती, चार जाहले दो हातांचे,
समोरच्या चाळीतिल सरला, ये उजळाया भाग्य तयाचे

नव्हता चॉइस्, प्रेमहि नव्हते, नव्हते लफडे कोठे चालित
नव्हती फुरसत प्रेम कराया, आणि तशी उधळाया दौलत

प्रेम करावे धनवंतांनी, तेच नव्हे का ध्येय तयांचे ?
प्रेम जगावे, प्रेम मरावे, काम नव्हे परि हे गरिबांचे

गरिबाघरची पोर विचारी, प्रेम जमावे कैसे तिजला
मिळेल तो नग पदरीं झेलित, जगायचे, हे जाणे सरला

असेच जीवन गमे मुलींचे, लपवित अश्रू हसावयाचे
मिळेल त्याची घाशित भांडी, टाळित मरणा, जगावयाचे
जंटलमन पति, नव्हता चावट, तशात खोली एकच घामट
सारे सारे होते कोंदट, प्रेम वनावे कैसे वात्रट ?
बँड परी होता लग्नाला, पाँ, पाँ, कँ कँ, टाँ टाँ, वाजत
परी न देई बँड सानुला, रामूच्या संसारा संगत
तज्ञ सांगती तया ऐकिले, कधीतरी वांतीचे रोदन
वजेट वळवी रागिट दृष्टी, हळूच निसटे वैदु घरातुन
असे चालता अ-बँड जीवन, चार पळाली वरूषे लाजत,
घरातल्या काचेच्या वस्तू, कुणि न फोडिल्या हासत, नाचत
आणि लागता वर्ष पाचवे, म्हणे, " प्रिये, करू आज दिवाळी
काकूंच्या खानावळि माजी, मिळे म्हणे वासुंदि आगळी ! "
प्रेम अनावर होता यापरि, त्वरित गाठिली पहिली पंगत
स्नेह लाभता पक्वान्नाचा, कुणा रूचे कोणाची संगत ?
आणि संपता भोजन नामी, उठे कलेक्टर हासत हासत,
किडलेल्या दातावर होते, वासुंदीचे थेव तरंगत

आठ वाजले होते रात्रीं, होती चेपित पत्नी पाया
पाय चेपिता असेच जाते कुणाकुणाचे जीवित वाया!
पाय चेपिता ये कंटाळा, सरलेला, उठली ती तेथुन
जवळ बसोनी हळूच फिरवी, मृदु बोटे कुरळ्या केसातुन
करी वाकडी मान जराशी, निरखाया मुख पतिराजांचे
परंतु होते निरखित काही, नेत्र वटोळे रामूजीचे
अशीच आहे मौज जगाची, जे पाही, त्या पाहि न कोणी,
होती सांगत सरला काही, पतिराजांच्या जाइ न कानीं
होते निरखित नेत्र रामूचे, जाहिरात ती नवचित्राची!
होती सांगत जी दुनियेला, 'लुटा, मजा हो नवप्रणयाची!'
लक्ष न देता अगदी अगदी, गळ्यातल्या सरलेल्या पाशा,
दावी रामू वाचुनि निजला, पत्रकातली गोंडस भाषा
"चुंबन चुंबन जागोजागीं, घ्या मोजुनि प्रेमाची वांगी
पहा कसे भर रस्त्यावरतीं, राजा-राणी चुंबन देती

पहा, पहा! जन, त्वरा करोनी, अर्ध नग्न देहाची गंमत
पुष्ट स्तनांचा लुटा फुलोरा, अशीच आणिक बहोत जंमत!"

रामू दाते उठे अचानक, सोडवीत विळखा पत्नीचा,
म्हणे, " जाऊ या आज पहाया, नूर आगळा नवचित्राचा."
सजली सरला, सुंदर कपडे, अंगावर इंदोरी लुगडे
वरे जाहले! ब्याद न होती! छळाछळाया संगति छबडे !
प्रेम चालता रजतपटावरि, होई सरला प्रेम-विव्हला
घे, सरकोनी जवळ पतीच्या, अंधारीं चिमटा हाताला.
तोच चिडोनी वदतो रामू, " मूर्ख किती तू अगदी गाढव
नको उगाचच घेऊ चिमटे, पहा समोरिल प्रीती-तांडव."
खूष जाहला रामू दाते, पाहुनिया ते चित्र गुलाबी
धुंद करी त्या काश्मिरातली, पडद्यावरची प्रीत शराबी.
होऊनिया आनंद अनावर वदे, "अहाहा ! प्रेम हे खरे !"
आणि वाजवी टाळ्या खुळचट, थिएटराचे विसरित वारे.
चित्र संपता ये बाहेरी, चित्त न होते परी ठिकाणीं
होती हृदयावरती नाचत, चित्रपटाची सुंदर राणी.
आणि निघाला मध्यरात्रिला, सरलेचा मृदु हात न धरता
असेच जाती नवरे सज्जन, वेडेविद्रे काहि न करता.

होता हासत चंद्र अंबरीं, होत्या हासत वरीं चांदण्या
शेजारिल गाला चंदेरी, ना सुचले स्पर्शाया प्राण्या
मधेच "शुक् शुक्" आले कानीं, हाक परंतु जाई वाया,
खिडकीमाजीं सुंदर मुखडा, सज्ज, अहाहा ! प्रेम विकाया.
अशीच आहे शहरी गंमत, फुकट न काही, फुकट न काही
जरी पाहिजे काही काही, मोजित पैसा लुटा नवाई.
असेच कोणी रस्त्यामाजीं, होते खेळत खेळ प्रीतिचे
कसे सज्जना परी रुचावे, खेळ असे हे मूढपणाचे ?
चित्रपटाने दिधले सारे, काहि न आता होते उरले,
चाख चाखता प्रेम गुलाबी, पोट तयाचे होते भरले
चाळ गाठिली चालत चालत, विसरोनी चंदेरी रजनी
नीतिवाज पति, नीतिवाज पति, मानी अर्धांगीला भगिनी!
घरीं पोचता त्राण न उरले, दिली तयाने एक जांभई
शहरी-संसारात अहाहा ! जीवन म्हणजे दीर्घ जांभई
म्हणे कलेक्टर देत जांभई, " प्रिये, पाहिले आज आगळे
चुंबनातील जा ऽऽ जाऽऽजाऽऽजा,
'दू' न संपता मिटले डोळे,

## लावण्याची कळी

वाइ, मी लावण्याची कळी,
वाइ, मी लावण्याची कळी
फुलले स्वर्गगेच्या जळीं
फुलले स्वर्गगेच्या जळीं.
फुलवा, फुलवा, गे फुल-वागा
नको तृणाला कणभर जागा,
नको, नको, शेतांच्या रांगा
उगाच जाई वाया भूमी
नावडती मज मुळी,
वाइ, मी लावण्याची कळी.
ठेवा, ठेवा चंद्र नभाला
शीतळ चंदन पुरवा मजला
घालवुनी द्या रविरायाला
उन्हांत करपे कोमल काया,
बुडवा रविला जळीं
वाइ, मी लावण्याची कळी.
नको, नको तो पाउस बाई,

चिखलाची मग गडबडघाई
घाण देखिता प्राणचि जाई
घाणीमाजी उगवे सारे
कोण तयाते गिळी,
वाइ, मी लावण्याची कळी.
आवडते मज मद्य सुगंधी,
जळ साधे! छे! मौज न अगदी,
थंड झरा अंतरा न वेधी,
नद्यानद्यातुन टाका मद्यें
येइल चव वेगळी
वाइ, मी लावण्याची कळी.
कुणी ओतिले मीठ सागरीं ?
आणा, आणा गोण साखरी,
बनवू सरबत गोड झडकरी,
केशर टाकू आणिक थोडे
उतराया ते गळीं,
वाइ, मी लावण्याची कळी
फुलले स्वर्गगेच्या जळीं.

## काय रुचे मज ?

विचारिसी नित काय रुचे मज,
काय रुचेना, काय नावडे
आजवरी ना वदलो काही
आज परी तुज कथितो थोडे

प्रथमचि कथितो, प्रियतम तू मज
तुझ्या संगतीं मज संजीवन
तूच उजळिली ज्योत या तमीं
तूच एकले माझे जीवन

आवडती मज थोर सती त्या
फुले जयांचे हास्य आसवीं
आवडती मज वृद्ध धुरंधर
प्रसन्न ज्यांच्या मुखीं भैरवी

आवडती मज तेच वहाधर
करिती हत्त्या प्रीतीसाठी,
आवडतीं मज मंगल पतिता,
हृदयीं ज्यांच्या नित जगजेठी

आवडती मज तेच कलंदर
खेळ चोरटे जया न जमती,
हराम ते! गृहराणी फसवित
लुटती नित बाजारी प्रीती !
प्रिय मजला जे मृत–संसारीं
सुधा वर्षिती नित्य पिलांवर
जरी भंगली स्वप्ने सारीं
प्राण तयांचा नित वाळांवर
आवडती मज ते मुक्तात्मे,
रक्त जयांचे निर्भय, सोज्वळ
देहनिष्ठ ना ज्यांची नीती
नित्य जयांचा आत्मा निर्मळ
आवडती मज कविवर वेडे
वेड जयांते नित स्वप्नांचे
आवडती ते, जया रुचे मी,
वेड जयांते, मम वेडांचे.

## आजार

( हा कसला आजार बरे ? )
जन्मभरी आलो खात,
गोड गोड दूधभात
तुज दिले नाही काही
असा दुष्ट मी कसाई...
हिंडहिंडलो मी राने
मुखीं खेळे नित्य गाणे,
तुज ठेविले कोंडून
पंख टाकिले कापून...
कधी कधी आक्रंदशी
पंख रागें आपटशी
चोंच ठेविली दाबून
जीभ जाई रक्ताळून....
लुळापांगळा तूं आता
नाही वैद्यराज हाता
दवा कोंणत्या बाजारां
माझ्या 'आंतल्या' आजारा ?

# मागे वळुनी

मागे वळुनी आज पहातां कळते सारे सारे
कसा शिरावर पेलित आलो लक्ष चुकांचे भारे
कसे टाळुनी राजपथाला, उगाच रानीं रमलो
चार फुगे रंगीत पाहता, कसा दिवाणा झालो
कशी आंसवे सन्मित्रांची ना कळली मूढा या
कसा निसटलो मागिल दारीं मानधनां टाळाया
कसा वरळलो चार कणाचे ज्ञान लाभतां हातीं
कसा बैसलो उजळित अपुला अज्ञानाच्या वाती
दिव्यत्वाचे घडता दर्शन कसा न झालो वेडा
पतितांच्या हृदयातिल ईश्वर कसा नुमगला मूढा
स्वार्थामाजी प्राण कोंदला, धन–पूजन नित केले
छायेमागे धावधावता आयू वाया गेले
आणि अचानक, असेच केव्हां, भाग्य उजळता दारीं
या मूढानें कसा सुधा-घट पाठविला माघारी !
चुकले घोडे ! फसली शर्यत ! परंतु अक्कल वाया !
तीच कथा ना पुन्हां-लागता त्याच पथाने जाया ?

८१३५० काव्य
२१३५ २५।२।०४

## जे आहे ते आहे माझे

जे आहे ते आहे माझे
ना उसने कोणाचे ओझे·
सुमने ही माझ्या बागेची
ऊब तयां माझ्या श्वासाची,
जे खुपले, जे हृदयीं सलले
शब्द–मुखातुन ते ऐकविले
हे नोव्हे फिल्मी आक्रन्दन
यंत्रमुखातिल लटके रोदन.
नको कथू मज कसे लिहावे
काय तुझ्या कंठाने गावे ?
कसा संचरू तुझ्या पदाने ?
कसा स्फुरू मी तव श्वासाने ?
वापरले मी नित माझे बल
ज्योत आतली राखित निर्मळ
स्फुरेल माझी अशीच वाणी
अशीच गातिल माझी गाणी.
जे आहे ते आहे माझे
मौज तयातचि ! – कारण 'माझे ! '

REFBK-0019076
REFBK-0019076